नागपूर मुख्य कार्यालय
कॉटन मार्केट, नागपूर -४४००१८

संपर्क
संपादकीय : ९९२२९७००२३
वितरण : ८८८८६४७७५३
जाहिरात : ७४४७७३५८५१ /९३२६९०६०६२
नागपूर कार्यालय संपर्क : ७४४७७३५८५१

नागपुर, अकोला, अमरावती, खामगांव, यवतमाळ, वर्धा, गडचिरोली, वाशीम, भंडारा, गोंदिया, मुंबई, पालघर (ठाणे), नाशिक आणि चंद्रपूर महासागर

# महासागर

www.dainikmahasagar.in / Epaper: www.epaper.dainikmahasagar.in nagpurpost@gmail.com / mahasagarngp@gmail.com

* वर्ष ५० * अंक ३३४ * * अमरावती * शनिवार, दिनांक ३१ मे २०२५ ८ पाने ● किमत रू. २/-+ वितरण खर्च रू. १ = एकुण ३ रू.) * विशेष ऑफर : महासागर + नागपूर पोस्ट = ४ रु. फक्त


## केंद्राचे परराष्ट्र धोरण अपयशी : काँग्रेस

■ **वृत्तसंस्था, नवी दिल्ली, दि. ३० :**
काँग्रेस नेते पवन खेरा यांनी शुक्रवारी मोदी सरकारच्या 'ऑपरेशन सिंदूर'बाबतच्या परराष्ट्र धोरणाला अपयशी ठरल्याचे म्हटले. सरकारच्या अपयशी राजनैतिक धोरणामुळे आणि कमकुवत परराष्ट्र धोरणामुळे भारताची प्रतिमा खराब झाली आहे, असा आरोप काँग्रेसने केला.

ते म्हणाले की, कोणताही देश पाकिस्तानला दहशतवादी देश म्हणत नाही. ऑपरेशन सिंदूर दरम्यानही कोणीही तुमच्या समर्थनार्थ कोणतेही विधान केले नाही. जुन्या स्टील मिल्स पुन्हा सुरू करण्यासाठी रशियानेही पाकिस्तानसोबत सामंजस्य करार केला आहे. आता, पाकिस्तानला रशियाकडून २.६ अब्ज डॉलर्स (२१,६६० कोटी रुपये) मिळतील.

अग्राग्रलेख

## खरीखरी..

### अशा-अशाही लाडक्या बहिणींचा कावा

जो धक्के से चले उसे कार कहते है, और जो बिना धक्के से चले उसे सरकार कहते है... अशी एक म्हण आहे. राज्यातील विधानसभा निवडणुका पूर्वीच्या काळात अनेक योजनांची घोषणा करण्यात आली. त्यात सर्वाधिक हिट्ट योजना म्हणजे लाडक्या बहिणींना मदत. ही मदत देताना अनेक लाडक्या बहिणी आधीच सरकारच्या महा लाडक्या होत्या. म्हणजे त्या सरकारी नोकरीमध्ये होत्या. पण ते त्यावेळी बघणे योग्य वाटले नव्हते?. त्यानंतर आतापर्यंत पडताळणी केलेल्या बहिणींमधील जवळपास अडीच ते पावणेतीन हजार सरकारी नोकरीत असलेल्या बहिणींनी अगदी कावा करून गरज नसताना या योजनेचा लाभ घेतलेला आहे. आता या सर्व लाडक्या बहिणींची ओवाळणी कर्ज काढून देण्याचे दिवस आलेले आहेत. त्यामुळे ज्या बिचाऱ्या खरोखर गरीब गरजू लाडक्या बहिणी आहेत. त्यांना लाभ मिळाला पाहिजे. त्या ऐवजी सरकारी नोकरी करणाऱ्या आणि अधिकृतपणे दरमहा हजारो आणि वषार्काठी लाखो रुपये कमावणाऱ्या अनेक महिलांनी आतापर्यंत दरमहा पंधराशे रुपये बिनदिक्कतपणे लाटले. हे सत्य समोर आले आहे. हा झाला सरकारी बहिणींचा आकडा. आता ८ लाख ८५ हजार बहिणींनी नमो शेतकरी योजना आणि लाडकी बहीण योजना या दोन्ही योजनांचा लाभ घेतलेला आहे. आता ही आकडेवारी समोर आल्यानंतर या बहिणींना काय म्हणावे. हेच आम्हाला समजेनासे झालेले आहे. ऊस गोड आहे म्हणून तो मुळासकट खाण्याचा हा उद्योग किती घातक होऊ शकतो. हे अजून या बहिणींना समजलेले नाही. सरकारी नोकरीत असलेल्या बहिणींना असा लाभ देणे किंवा घेणे म्हणजे सरकारची फसवणूक करणे आहे?. हे समजत नसेल तर अशा बहिणींना सरळ सरळ घरी बसवले पाहिजे. कारण सरकारी बहिणींची बाब अत्यंत गंभीर आहे. इकडे डबल लाभ घेणाऱ्या बहिणींना या दोन्हीही लाभांपासून वंचित केले पाहिजे. असा सामान्य जनतेचा सूर आहे. या विषयावर आम्ही अधिक भाष्य करणे बरोबर नाही. कारण सरकार निर्णय घेण्यासाठी सक्षम आहे. म्हणूनच सूत्रबद्ध रीतीने जे होऊ नये. ते झाल्यामुळे संबंधित अपराधी बहिणींना त्यांच्या कृत्याबद्दल काय शिक्षा होते. हे महाराष्ट्रातील गरीब लाडके भाऊ बघत आहेत. सत्तारूढ भावांनी आपला भाव वाढवण्याकरता जो उदारतेचा आव आणला. तेव्हा त्यांनाही हा धडा आहे की थोड्याशा फायद्यासाठी गडबड-बडबड करून शेवटी बदनामी हाती लागते. अर्थात हे त्यांना समजलेले असेलच. यातून पुढे काय निष्पन्न होते. ते पाहण्याची उत्सुकता सर्वांनाच आहे. हे मात्र खरे आहे.


nagpurpost@gmail.com
Mob. No. 9922970023


# दहशतीचा फणा बिळातून काढून भारत ठेचेलच!

■ **वृत्तसंस्था, सासाराम, दि. ३० :**
पहलगाम येथील दहशतवादी हल्ल्यात निष्पाप लोक मारले गेले. या हल्ल्याच्या दुसऱ्या दिवशी मी बिहारला आलो. मी बिहारच्या भूमीवरून देशाला वचन दिले होते. दहशतवाद्यांच्या मालकांचे अड्डे जमीनदोस्त केले जातील.' 'बिहारच्या भूमीवर, मी म्हटले होते की त्यांना कल्पनेपेक्षा मोठी शिक्षा मिळेल. आज जेव्हा मी बिहारमध्ये आलो आहे, तेव्हा मी माझे वचन पूर्ण करून आलो आहे.'

बिहारमधील सासाराम येथील दुर्गाडीह येथे एका जाहीर सभेला संबोधित करताना प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी पुन्हा एकदा दहशतवादाविरूद्ध कठोर पावले उचलण्याची हमी दिली.

ते म्हणाले, 'ज्यांनी पाकिस्तानात बसून आमच्या बहिणींचे सिंदूर नष्ट केले होते. आमच्या सैन्याने त्यांचे अड्डे उध्वस्त केले. पाकिस्तान आणि जगाने भारताच्या मुलींच्या सिंदूरची शक्ती देखील पाहिली.' जर दहशतीचा कणा पुन्हा उभा राहिला तर आम्ही त्याला त्याच्या बिळातून बाहेर काढू आणि चिरडून टाकू. मग ते सीमेपलीकडे असो किंवा सीमेच्या आत.'



पंतप्रधानांनी काँग्रेस आणि राजदवर निशाणा साधला .पंतप्रधान मोदी म्हणाले, बिहारमध्ये सर्वात जास्त फसवणूक झाली. ज्यांच्या राजवटीत बहुतेक लोक राज्य सोडून गेले. तेच लोक सामाजिक न्याय देण्याचा आव आणत आहेत.

आमचे सरकार बिहारमधील शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढवण्यासाठी सतत काम करत आहे. १४ पिकांच्या एमएसपीमध्ये वाढ करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. रेल्वेचेही आधुनिकीकरण केले जात आहे. हे आधीच करता आले असते . जेव्हा सुरक्षितता आणि शांतता असते तेव्हाच विकासाचे नवे मार्ग उघडतात. नितीशजींच्या नेतृत्वाखाली जंगल राज हद्दपार झाले तेव्हा बिहार विकासाच्या मार्गावर वाटचाल करू लागला . आता नक्षलवादही संपुष्टात येण्याच्या मार्गावर आहे.

## वैष्णवी प्रकरणात कोणालाही सोडले जाणार नाही

### अतिशय कडक शिक्षा झाली पाहिजे

■ **वृत्तसंस्था, पुणे, दि. ३० :**
मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस शुक्रवारी पुण्यात होते. यावेळी त्यांनी प्रसार माध्यमांशी संवाद साधला. वैष्णवी हगवणे मृत्यू प्रकरणातील नीलेश चव्हाण याला नेपाळच्या बॉर्डरवरून ताब्यात घेण्यात आले आहे. यावर प्रतिक्रिया देताना फडणवीस म्हणाले की, या प्रकरणात जेवढे कोणी लोक असतील कोणालाही सोडले जाणार नाही.



ते म्हणाले, पोलिसांनी अतिशय चांगली कारवाई केली आहे. नेपाळला पळून जाण्याची तयारी होती परंतु पोलिसांनी बॉर्डरवरच त्याला अटक केली आहे. योग्य प्रकारचे इंटेलिजेंस प्राप्त करून हा सगळा ट्रॅप पोलिसांनी तयार केला. त्यामुळे आता त्यालाही ताब्यात घेण्यात आले आहे.

मी पहिल्याच दिवशी सांगितले होते की या प्रकरणात जेवढे कोणी लोक असतील कोणालाही सोडले जाणार नाही, कुठलीही हयगय केली जाणार नाही आणि अतिशय कडक अशी शिक्षा झालीच पाहिजे हा प्रयत्न आमचा असणार आहे.

लाडकी बहीण योजनेवर बोलताना फडणवीस म्हणाले, लाडकी बहीण योजनेच्या निकषात नसलेल्या काही लोकांनी अर्ज करून त्या काळात याचा लाभ घेतला आहे हे माहीत असल्यामुळेच आम्ही सातत्याने या संदर्भात चौकशी करत आहोत. आम्हाला जे कोणी लोक असे आढळून येत आहेत आम्ही त्यांना कमी करत आहोत. अजून याचा तपास पूर्ण झालेला नाही. त्यानंतर तुम्हाला सगळी माहिती देऊ.

आयजी जालिंदर सुपेकर यांच्या संदर्भात प्रतिक्रिया देताना देवेंद्र फडणवीस म्हणाले, अशा प्रकारची तक्रार आलेली आहे. त्या तक्रारीत किती तथ्य आहे हे पाहण्यासाठी मी सांगितले आहे. आणि दुसरे कुठल्याही प्रकारे कोणीही या तपासात दबाव आणू नये किंवा या तपासात गडबड करू नये या दृष्टीने आम्ही काही निर्णय घेतले आहेत.

## अजित पवार गोचिडासारखे अर्थ खात्याला चिटकले आहेत...

लक्ष्मण हाकेंची टीका



■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ३० :**
अजित पवार गोचिडासारखे अर्थ खात्याला चिटकले आहेत, अशी टीका ओबीसी नेते लक्ष्मण हाके यांनी केली आहे.

राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते अमोल मिटकरी हा फडतूस असल्याचेही हाके यांनी म्हटले आहे. मी जर बोललो तर मिटकरी आणि त्यांचा आका अजित पवार यांच्या अंगावर कपडे राहणार नाहीत, अशा शब्दात लक्ष्मण हाके यांनी टीका केली आहे.

प्रसार माध्यमांशी बोलताना लक्ष्मण हाके म्हणाले, गेल्या २० वर्षापासून अर्थ खात्याला चिटकून बसलेल्या अजित दादांनी अर्थ खात्यात पीएचडी केलीय का? ते तर साधे कोंबडीच्या पोल्ट्री फार्म वाले आहेत. त्यांचे राजकारण सत्तेसाठी पैसा आणि पैशासाठी सत्ता असे आहे.

ते सामाजिकदृष्ट्या असंवेदनशील आहेत. यांनी भटके विमुक्त आणि मागास महामंडळाला ५० पैसे सुद्धा त्यांनी दिले नाहीत.

## दररोज १५-२० किमी चालणार भाजपचे खासदार

■ **वृत्तसंस्था, नवी दिल्ली, दि. ३० :**
मोदी सरकार ऑपरेशन सिंदूरचे यश घराघरात पोहोचवण्याची तयारी करत आहे. भाजपच्या एका वरिष्ठ नेत्याने सांगितले की, ते ९ जूनपासून सुरू होईल. या दिवशी नरेंद्र मोदी यांनी तिसऱ्यांदा पंतप्रधानपदाची शपथ घेतली, म्हणजेच मोदी ३.० लाँच झाले.

मोदी ३.० सरकारची कामगिरी लोकांपर्यंत पोहोचवणे, हा या मोहिमेचा मुख्य उद्देश आहे. यासाठी जनसंपर्कादरम्यान ऑपरेशन सिंदूरवर प्रकाश टाकणारी पत्रकेही वाटली जातील.

या मोहिमेत सर्व केंद्रीय मंत्री, एनडीएचे खासदार आणि संघटनेचे वरिष्ठ अधिकारी सामील होतील. महिनाभर चालणाऱ्या या कार्यक्रमात, सर्व लोकसभा खासदारांना त्यांच्या मतदारसंघात दररोज १५-२० किमी चालावे लागेल आणि मंत्री जनसंपर्कासाठी आठवड्यातून दोन दिवस २०-२५ किमी प्रवास करतील.

ऑपरेशन सिंदूर दरम्यान ज्या कोणत्याही स्वरूपात योगदान देणाऱ्या प्रत्येक विभागाचा माहितीपट बनवला जाईल. ते त्या विभागात काम करणाऱ्या लोकांना आणि त्यांच्या कुटुंबियांना दाखवले जाईल.

## प्लास्टिक प्रदूषणाचा अंत करण्यासाठी राज्य सरकारचे हिरवे मिशन!

### अडीच कोटींच्या जनजागृती मोहिमेस मंजुरी

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ३० :**
प्लास्टिक प्रदूषणाचा अंत ही जागतिक हाक आता महाराष्ट्रात प्रत्यक्ष कृतीत उतरवली जाणार आहे! पर्यावरण संवर्धनासाठी आणि लोकांमध्ये पर्यावरणपूरक जीवनशैली रुजवण्यासाठी राज्य सरकारने अडीच कोटींची जनजागृती मोहीम हाती घेतली असून, उद्यान, समुद्र किनारे, शाळा-कोलेज, पर्यटनस्थळे आणि सार्वजनिक जागांवर ५ जूनपासून थेट मोहिमेला सुरुवात होणार आहे.



**राज्यभर जनजागृतीची लाट**

दरवर्षी ५ जून रोजी साजऱ्या होणाऱ्या जागतिक पर्यावरण दिनानिमित्त, यंदा 'जागतिक प्लास्टिक प्रदूषणाचा अंत' ही संकल्पना घेऊन राज्यभरात जनजागृती मोहीम राबवली जाणार आहे. या मोहिमेसाठी २ कोटी ४९ लाख ४९ हजार रुपये खर्च करण्यात येणार असून, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या माध्यमातून तो केला जाणार आहे. शासनाने यासंदर्भात अधिकृत आदेशही शुक्रवारी जारी केले.

**एकल प्लास्टिकला लाल कार्ड**

यंदाची थीम संयुक्त राष्ट्र संघाच्या युएनईपी केंद्र सरकारच्या मिशन लाईफ या उपक्रमांशी सुसंगत आहे. प्लास्टिकचा एकल वापर थांबवणे, पर्याय शोधणे, कचरा व्यवस्थापन सुधारणा आणि जनतेत सशक्त जनजागृती निर्माण करणे हे यामागील उद्दिष्ट आहे.

**मोहिमेचा झंकार**

या मोहिमेअंतर्गत शहर व ग्रामीण भागातील बगीचे, समुद्र किनारे, बस-रेल्वे स्थानके, पर्यटनस्थळे, शैक्षणिक संस्था, देवस्थान इत्यादी ठिकाणी स्वच्छता आणि जनजागृती कार्यक्रम होणार आहेत. विशेषतः विद्यार्थी, युवक मंडळं, नागरी संस्थांपासून ते बाजार समित्या आणि उद्योजक मंडळांपर्यंत या मोहिमेत सक्रीय सहभाग अपेक्षित आहे.

**प्लास्टिकमुक्त महाराष्ट्राचे स्वप्न**

या उपक्रमात प्लास्टिकच्या पर्यायांचा शोध, कचऱ्याचे प्रभावी व्यवस्थापन, आणि स्वच्छतेसंबंधी सहभागी क्रियाकलाप राबवले जाणार असून, नागरिकांना दीर्घकालीन परिणामांची जाणीव करून देणे हाच केंद्रबिंदू असणार आहे.

## सम्राट अकबरचे जोधाशी लग्नच झाले नव्हते...

### राजस्थानचे राज्यपाल हरिभाऊ बागडे यांचा जावईशोध

■ **वृत्तसंस्था, उदयपूर, दि. ३० :**
सम्राट अकबर व जोधा यांच्या लग्नाची कथा ही मुघल सम्राट साम्राज्याच्या विस्तारासह राजपुती शौर्य व प्रेमाचा सुंदर संगम मानला जातो. या वैवाहिक बंधनाने मध्ययुगीन भारतात राजकीय मैत्री व सांस्कृतिक एकतेचा पाया रचला गेला. १५६२ च्या आसपास झालेले हे लग्न केवळ दोन व्यक्तींचे मिलन नव्हे तर मुघल व राजपूत परंपरांचा एक ऐतिहासिक संयोग होता.

पण आता भाजपचे ज्येष्ठ नेते तथा राजस्थानचे राज्यपाल हरिभाऊ बागडे यांनी सम्राट अकबर व जोधाच्या लग्नाची गोष्ट धादांत खोटे असल्याचे सांगत एका नव्या वादाला फोडणी दिली आहे.

हरिभाऊ बागडे उदयपूर येथे आयोजित एका कार्यक्रमात बोलताना म्हणाले की, भारताच्या इतिहास लेखनात ब्रिटिशांच्या प्रभावामुळे अनेक खोट्यात गोष्टींचा समावेश करण्यात आला. विशेषतः जोधाबाई व मुघल सम्राट अकबर यांच्या विवाहाचा उल्लेख अकबरनामा मध्येही नाही. त्यामुळे हा विवाह व त्यावर आधारित चित्रपट हा पूर्णतः काल्पनिक आहे. अकबर - जोधाचे लग्न खरे नाही. अकबरचे लग्न जोधाबाईशी नव्हे तर भारमल नामक राजाने आपल्या एका दासीच्या मुलीशी लावून दिले होते.



ब्रिटिशांनी आपल्या वीरांचा इतिहास बदलून दाखवला. त्यांनी तो पूर्णपणे नोंदवलाच नाही. तत्कालीन लोकांनी जे काही लिहिले ते पूर्णतः एकतर्फी होते. काही भारतीय इतिहासकारांनी लिहिलेल्या इतिहासावर ब्रिटिशांचा प्रभाव होता.

हरिभाऊ बागडे यांनी यावेळी महाराणा प्रताप यांनी अकबराला शस्त्रसंधी संबंधी पत्र लिहिल्याचा दावा खोटा असल्याचाही दावा केला. उल्लेखनीय म्हणजे गुरुत्वाकर्षण सिद्धांतांवरही त्यांनी यापूर्वी वादग्रस्त विधान केले होते.

## महायुतीचा नो रिस्क फॉर्म्युला!

### भाजप स्वबळाच्या चर्चांना पूर्णविराम

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ३० :**
स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांची रणधुमाळी जवळ येत असताना, भाजपकडून स्वबळावर निवडणूक लढवण्याच्या चर्चा रंगत होत्या. मात्र, महत्त्वाच्या महापालिकांसाठी महायुतीने नो रिक्स धोरण स्वीकारल्याचे समजते.

मुंबई, ठाणे, पुणे, नाशिक, संभाजीनगर आणि नवी मुंबई यांसारख्या महत्त्वाच्या महापालिकांमध्ये तिन्ही घटक पक्ष - भाजप, शिवसेना (शिंदे गट) आणि राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) - एकत्र निवडणूक लढवणार असल्याची माहिती आहे. या धोरणामागे विरोधकांना काहीही संधी न देण्याची रणनीती असल्याचेही समजते. एकत्र लढल्यास सिंबायोटिक प्रभाव निर्माण होईल आणि जागा जिंकण्याचा टक्का मोठ्या प्रमाणात वाढेल, असा महायुतीचा विश्वास आहे.

## उपराजधानीच्या तरुणांचे हिमालयात यश

### १४१०० फुटांवरील भृगु लेक ट्रेक ८ साहसवीरांनी केला पूर्ण



■ **महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. ३० :**
हिमालयातील १४,१०० फूट उंचीवर असलेल्या धौलाधर आणि पीर पंजाल पर्वतरांगानी वेढलेल्या व अल्पाईन कुरणांनी सजलेला भृगू लेक ट्रेक नागपूरच्या आठ साहसीवीरांनी यशस्वीरित्या पूर्ण केला. समिधा देशपांडे, समर्थ राव देशमुख, सार्थक वाघमारे, ध्रुव बलेचा, देव्यांश खत्री, हर्षित जैन, वंश जैन, आर्य जयस्वाल अशी या आठ साहसीवीरांची नावे आहेत.

सीएसी-ऑलराउंडरच्या हिमालयन कॅम्प दरम्यान हे साहसवीर या भृगू लेक ट्रेकवर गेले होते. १७ ते २७ मे दरम्यान हा ट्रेक आयोजित केला करण्यात आला होता. कॅम्प ॲपल फार्मपासून सुरू झालेल्या या ट्रेक दरम्यान या साहसवीरांनी निसर्गातील नाट्यमय व तितकेच रोमांचक बदल अनुभवले. वाटेत लागलेली दाट पाइन आणि देवदार जंगले, बर्फाच्छादित शिखरांमधून वाट काढत ही मुले निसर्गरम्य अशा गोठलेल्या भृगु लेकवर यशस्वीरित्या पोहोचली.

हा ट्रेक केवळ पर्वतांमधून प्रवास करण्याच्या उद्देशाने आयोजित केला नव्हता तर स्वतःचा शोध घेण्याचा, बंध निर्माण करण्याचा आणि निसर्गाशी पुन्हा जोडण्याचा प्रवास होता, असे समिधा देशपांडे म्हणाली. संपूर्ण मोहिमेदरम्यान उत्तम टीमवर्क, शिस्त आणि लवचिकता दाखवल्यामुळे आम्हाला हा साहसी आणि संस्मरणीय प्रवास पूर्ण करता आला, असे सार्थक वाघमारे म्हणाला. हा ट्रेक पूर्ण करण्याकरिता साहसवीरांना शिरीष देशमुख आणि दक्ष खंते या अनुभवी ट्रेकर्सचे मार्गदर्शन लाभले.

## नागपुरच्या सहकारी पत संस्थेत कोट्यवधींचा घोटाळा?

■ **महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. ३० :**
सर्वसामान्यांकडून निवृत्तीनंतर मिळालेला अथवा इतर मार्गाने कमावलेला पैसा सुरक्षीत ठेवण्यासाठी बँकेची निवड केली जाते. परंतु नागपुरातील हजारो नागरिकांकडून इंदोरातील उत्थान नागरी सहकारी पतसंस्थेत ठेवलेला पैसा अडचणीत आला आहे.

या संस्थेत कोट्यावधींचा घोटाळा झाल्याचे पुढे आले आहे. त्यामुळे नागरिकांचा पैसा पाण्यात गेला काय? हा प्रश्न अनुत्तरीत आहे. या प्रकरणात गुन्हा दाखल झाला आहे.

पोलिसांकडून या प्रकरणात इंदोरा येथील उत्थान नागरी सहकारी पत संस्थेचे अध्यक्ष आणि २० संचालकांसह एकूण २१ जणांविरुद्ध फसवणुकीचा गुन्हा दाखल केला गेला आहे.

या प्रकरणाचा तपास सुरू आहे. लेखापरीक्षक नारायण गाढेकर यांच्या तक्रारीवरून ही कारवाई केली गेली आहे. लेखापरीक्षकाच्या अहवालानुसार, २०१९ ते २०२३ या काळात इंदोरा येथील उत्थान नागरी सहकारी पत संस्थेकडून सामान्य नागरिकांकडून एफडी आणि बचत योजनांच्या नावाखाली कोट्यवधी रुपये जमा करण्यात आले. परंतु ही रक्कम नियमांनुसार गुंतवणूकदारांना परत करण्यात आली नाही.

दरम्यान या प्रकरणात नागरिकांकडून तक्रार करण्यात आली. त्यानंतर सदर पतसंस्थेत घोटाळा झाल्याचे पुढे येत आहे. त्यानुसार घोटाळ्यात सहभागी असलेल्यांमध्ये संस्थेचे अध्यक्ष महेंद्र जनार्दन राऊत आणि संचालक मंडळातील इतर २० सदस्यांची नावे समोर आली आहेत.

या सर्वांनी एजंटांच्या मदतीने नागरिकांचा विश्वास जिंकला आणि त्यांच्याकडून पैसे जमा केले आणि नंतर ती रक्कम संस्थेऐवजी वैयक्तिक फायद्यासाठी वापरली गेली. गुंतवणूकदारांना वेळेवर रक्कम न मिळाल्याने त्यांनी संबंधित अधिकाऱ्यांकडे तक्रार केल्यावर घोटाळ्याचा प्रकार पुढे आला.

इंदोरा येथील उत्थान नागरी सहकारी पत संस्थेत गुंतवणूक करणाऱ्या नागरिकांना पैसे परत मिळत नसल्याने त्यांनी संबंधित अधिकाऱ्याकडे तक्रार केली. त्यानंतर विशेष लेखापरीक्षकांनी संस्थेची सखोल चौकशी सुरू केली. चौकशीत इंदोरा येथील उत्थान नागरी सहकारी पत संस्थेत मोठ्या प्रमाणात अनियमितता आढळून आली. त्यानंतर लेखापरीक्षकांच्या अहवालानंतर पोलिसांनी कागदोपत्री पुरावे गोळा करण्यास सुरुवात केली आहे. प्रकरणाचे गांभीर्य लक्षात घेता पुढील कायदेशीर प्रक्रिया जलद करण्यात येणार आहे.

इंदोरा येथील उत्थान नागरी सहकारी पत संस्थेतील घोटाळ्यामुळे गुंतवणूकदारांमध्ये प्रचंड संताप आहे. त्यांनी प्रशासनाकडे सर्व दोषींवर कठोर कारवाई करावी आणि त्यांचे जमा केलेले पैसे परत करण्याची मागणी केली आहे. त्यामुळे हे पैसे कधी मिळणार? याकडे सगळ्यांचे लक्ष लागले आहे.

## दोन्ही पवार एकत्र येण्यास सुनील तटकरे अनब प्रफुल्ल पटेलांचा विरोध



**संजय राऊतांचा दावा**

**मुंबई :** दोन्ही पवार यांना एकत्र येण्यास अजित पवार गटाचे प्रदेशाध्यक्ष खासदार सुनील तटकरे आणि राष्ट्रवादीचे नेते प्रफुल्ल पटेल यांचा विरोध असल्याचा दावा ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांनी म्हटले आहे. दोन्ही पवार यांचे राष्ट्रवादी काँग्रेस एकत्र येणार अशी चर्चा गेली अनेक दिवस माध्यमांमध्ये सुरू आहे. यावर बोलताना ठाकरे गटाचे नेते संजय राऊत यांनी असे म्हटले आहे. दरम्यान संजय राऊत पुढे बोलताना म्हणाले की, एकनाथ शिंदे आणि अजित पवार गटाचे नेते एकत्र आहेत कारण त्यांना यंत्रणेच्या कचाट्यात अडकायचे नाही. म्हणून ते महायुतीमध्ये एकत्र आहेत. एकनाथ शिंदे आणि अजित पवार यांचा उद्धव ठाकरे यांच्याशी चांगला संवाद होता. महायुतीमध्ये हा संवाद का नाही याचा विचार देवेंद्र फडणवीस यांनी केला पाहिजे. ईडी चौकशी होऊ नये, आपल्यावर कारवाई होऊ नये म्हणून महायुती एकत्र आहे.

**प्रत्येकाकडून स्वत:च विचार सुरू**

संजय राऊत म्हणाले की, शरद पवार यांच्या विचारावर आमचा पक्ष चवालतो असे अजित पवारांच्या पक्षातील नेत्यांकडून सांगितले जाते. एकत्र यावे असे त्यांच्याकडून म्हटले जाते. पण जेव्हा एकत्र येण्याची वेळ येते तेव्हा ते एकत्र येत नाही. मोदी आणि शहा यांच्या मुख्य दुकानासोबत त्यांना आपले दुकान चालवायचे आहे. प्रत्येक जण आपला राजकीय फायदा पाहत असतो. प्रफुल्ल पटेल हे काही मोठे नेते नाही, हे सर्वांना माहिती आहे. तटकरे हे एका गटाचे अध्यक्ष आहे, तो जर विलिन झाला तर अध्यक्ष बदलावा लागेल, तसे होणार नाही. केंद्रातील मंत्रिपदाचा प्रश्न निर्माण होईल. प्रत्येक जण आपली व्यवस्था आपली सोय करण्याच्या प्रयत्नामध्ये आहे.

**जुलमी राज्यव्यवस्थेचे फडणवीस सूत्रधार**

संजय राऊत म्हणाले की, 'नरकातला स्वर्ग' हे पुस्तक देवेंद्र फडणवीस यांनी वाचावे कारण त्यांनी यंत्रणांचा गैरवापर केला आहे. जुलमी राज्यव्यवस्थेचे फडणवीस, पीएम मोदी, अमित शहा हे सूत्रधार आहेत. एकनाथ शिंदेंनी हे पुस्तक वाचले पाहिजे. त्यांना जर व्यवस्थित लिहता वाचता येत असेल तर त्यांनी पुस्तकाचा गाभा समजून घेतला पाहिजे. बराच काळ ते आमचे सहकारी होते. त्यांना माझ्या बाबतीत काय घडले याचे ते साक्षीदार आहेत म्हणून एकनाथ शिंदेंनी हे पुस्तक वाचले पाहिजे.

**महिला आयोगाच्या पद देताना विचार करावा**

संजय राऊत म्हणाले की, राज्य महिला आयोगाचे पद असो की केंद्रीय महिला आयोगाचे पद असो त्यावर राजकीय व्यक्तीला बसवणे अतिशय चूक आहे. पण एखाद्या नेत्याच्या जवळच्या महिला नेत्याची त्यावर निवड केली जाते. हे पूर्णपणे चुकीचे आहे.

## परिणय फुकेंशी संबंधित वादाची तक्रार मिळाली नाही



**रूपाली चाकणकर यांची स्पष्टोक्ती**

**नाशिक :** पुण्यातील वैष्णवी हगवणे प्रकरणात महिला आयोगाच्या भूमिकेवर अनेकांनी प्रश्नचिन्ह उपस्थित केले होते. त्यानंतर आता महिला आयोग चांगलाच कामाला लागला असून नाशिक मध्ये महिला आयोगाच्या माध्यमातून जन सुनावणीचे आयोजन करण्यात आले होते. या वेळी पत्रकारांनी विचारलेल्या प्रश्नांना देखील महिला आयोगाच्या अध्यक्षा रूपाली चाकणकर यांनी उत्तरे दिली. परिणय फुके यांच्या कुटुंबात असलेल्या वादाची आयोगाकडे कोणतीच तक्रार आलेली नसल्याचे यावेळी त्यांनी सांगितले. मात्र महिला आयोगाकडे येणाऱ्या प्रत्येक तक्रारीवर योग्य ती कारवाई करून तक्रार सोडवण्यासाठी १००% प्रयत्न केले जातील, असा विश्वास देखील त्यांनी यावेळी व्यक्त केला. नाशिक जिल्हाधिकारी कार्यालयातील नियोजन मंडळाच्या सभागृहात महिला आयोगाच्या अध्यक्षा रूपाली चाकणकर यांच्या अध्यक्षतेखाली 'महिला आयोग आपल्या दारी' उपक्रमाच्या माध्यमातून जन सुनावणी पार पडली. यात तक्रारदार आणि पीडित महिला स्थानिक पातळीवर तक्रार देखील तात्काळ दाखल करू शकतात. यासाठी महिलांना कोणतीही पूर्वसूचना देण्याची आवश्यकता नाही. त्या थेट जनसुनावणीस उपस्थित राहून, समस्या लेखी स्वरूपात आयोगापुढे मांडू शकतात. यावेळी रूपाली चाकणकर यांनी महिलांच्या बाजूने कायदे आहेत. कडक कायदे आहेत. मात्र, त्याला पळवाटा काढल्या जात असल्याबाबत चिंता व्यक्त केली आहे. ग्रामीण भागात आजही जन्म दाखल्यामध्ये बदल करून बालविवाह लावले जात आहेत. हुंडाबळीच्या विरोधात कायदे असूनही ते मोडले जात असल्याची खंत व्यक्त केली. मात्र महिलांनी अत्याचार विरोधात आवाज उठवायला हवा, आपल्याला तो अधिकार असल्याचे त्यांनी म्हटले आहे.

# लाडकी बहीण योजनेसाठी तिसऱ्यांदा पळवला

## ३३५ कोटी ७० लाखांचा निधी

■ **महासागर प्रतिनिधी,**
**मुंबई, दि. ३० :** महायुती सरकारची महत्वकांक्षी लाडकी बहीण योजना आता इतर महत्वाच्या विभागांच्या मुळावर येत असल्याचे स्पष्ट झाले आहे. सरकारने या योजनेसाठी तिसऱ्यांदा आदिवासी विभागाचा ३३५ कोटी ७० लाख रुपयांचा निधी वळता केला आहे. यामुळे आपसूकच नीती आयोगाच्या नियमांना पुन्हा एकदा हरताळ फासला गेला आहे. सरकारच्या या निर्णयावर टीका होण्याची शक्यता आहे. सरकार मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेंतर्गत लाभार्थी महिलांना दरमहा १५०० रुपयांचे अर्थसहाय्य करत आहे. पण यासाठी निधी उभा करताना त्याची मोठी दमछाक होत आहे. सरकारने या योजनेला लागणा?या निधीची अर्थसंकल्पात तरतूद केली आहे. पण त्यानंतरही इतर विभागांचा निधी वळता करून सरकार दिवस काढण्याचे काम करत आहे हे वेळोवेळी स्पष्ट होत आहे. माहितीनुसार, सरकारने लाडकी बहीण योजनेसाठी तिसऱ्यांदा आदिवासी विभागाचा ३३५ कोटी ७० लाख रुपयांचा निधी वळता केला आहे. यासाठी नीती आयोगाच्या नियमांना हरताळ फासला आहे. सरकारने यापूर्वीही दोनदा आदिवासी विभागाचा एवढाच निधी वळता केला होता. आता तिसऱ्यांदा या विभागाच्या निधीवर डल्ला मारला आहे. विशेष म्हणजे नीती आयोगाने सर्वच राज्यांच्या मुख्यमंत्र्यांसह केंद्र सरकारच्या सामाजिक न्याय विभाग व आदिवासी विभागाला पाठवलेल्या पत्रात दलित व आदिवासी समाजाचा निधी इतर कोणत्याही योजनेसाठी न वापरण्याचे स्पष्ट दिशानिर्देश दिले होते. आदिवासी विभागाने हेच दिशानिर्देश व नियमांच्या आधारावर हा निधी हस्तांतरित करण्याच्या निर्णयाला कडाडून विरोध केला होता. नियमानुसार, आदिवासी विभागाचा निधी त्याच विभागाच्या लाभार्थ्यांसाठी वापरला जातो. पण अजित पवारांच्या नेतृत्वातील अर्थखात्याने या नियमाकडे दुर्लक्ष करत आदिवासी खात्याचा निधी मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेसाठी वळता केला आहे. दुसरीकडे, आदिवासी विभागाचे मंत्री अशोक उईके यांनी आपल्या विभागाचा निधी पळवणे हा अपप्रचार असल्याचे म्हटले आहे. आदिवासी विभागाच्या योजनांची अंमलबजावणी करण्यात कोणतीही अडचण येणार नाही. लाडकी बहीण योजनेची प्रभावीपणे अंमलबजावणी करणे ही सर्वांची जबाबदारी आहे. त्यामुळे आदिवासी विभागाचा निधी कमी केला असे म्हणण्यात अर्थ नाही. आमच्या विभागाला मागच्या वर्षीपेक्षा १०० टक्के जास्त बजेट वाढवून मिळाले आहे. त्यामुळे विभागाची कोणतीही योजना बंद होणार नाही.

# धनंजय मुंडे यांची राष्ट्रवादीतून हकालपट्टी होणार:करुणा शर्मा



■ **महासागर प्रतिनिधी,**
**मुंबई, दि. ३० :** माजी मंत्री धनंजय मुंडे यांची सत्ताधारी राष्ट्रवादी काँग्रेसमधून लवकरच हकालपट्टी होईल, असा मोठा दावा त्यांच्या पत्नी असल्याचा दावा करणाऱ्या करुणा शर्मा मुंडे यांनी केला आहे. धनंजय मुंडे हे महाराष्ट्रातील सर्वात मोठा गुंड असल्याचेही त्या यावेळी म्हणाल्यात. करुणा शर्मा मुंडे शुक्रवारी पत्रकारांशी बोलताना म्हणाल्या, धनंजय मुंडे यांनी निवडलेला ध्यानधारणेचा मार्ग चांगला आहे. त्यांचे मंत्रिपद गेले आहे. आता त्यांची आमदारकीही जाणार आहे. एवढेच नव्हे तर राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष तथा राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी गुंड लोकांची पक्षातून हकालपट्टी करण्याचे सूतोवाच केले आहे. त्यानुसार ते तशी पाऊलेही उचलत आहेत. त्यामुळे ते धनंजय मुंडे यांचीही लवकरात लवकर हकालपट्टी करतील असे मला वाटते. कारण, महाराष्ट्रात सर्वात मोठा गुंडा कुणी असेल तर तो केवळ धनंजय मुंडे आहे.

**पंकजा मुंडेंना आता धनंजय मुंडेंची गरज उरली नाही**

पंकजा मुंडे यांनी धनंजय मुंडे यांनी विपश्यनेचा योग्य मार्ग निवडल्याची प्रतिक्रिया दिली आहे. करुणा शर्मा यावर बोलताना म्हणाल्या की, पंकजा मुंडे यांना आता मंत्रिपद मिळाले आहे. त्यांना आता धनंजय मुंडे यांची गरज राहिली नाही. धनंजय मुंडे यांनीच त्यांना मंत्रिपद मिळवून दिले. आता त्यांचे काम आता झाले आहे. त्यामुळे त्यांनी असे विधान केले असेल. आता त्यांचा मार्ग मोकळा झाला आहे. त्यांना परळीवर वर्चस्व निर्माण करायचे आहे. मी २००९ पासून मी त्यांच्यातील वाद पाहत आहे. त्यामुळे त्यांनाही कुठे ना कुठे तरी यांनी संन्यास घ्यावा असे वाटत होते, असे त्या म्हणाल्या.

**धनंजय मुंडे आठवड्याभरापासून विपश्यना केंद्रात**

उल्लेखनीय बाब म्हणजे माजी मंत्री धनंजय मुंडे सध्या नाशिकच्या इगतपुरी येथील विपश्यना केंद्रात ध्यानधारणा करत आहेत. त्यांनी मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्या प्रकरणात वाल्मीक कराडचा सहभाग आढळल्यानंतर आपल्या मंत्रिपदाचा राजीनामा दिला होता. त्यानंतर करुणा शर्मा मुंडे यांनीही त्यांच्यावर गंभीर आरोप केले होते. या प्रकरणी कोर्टाने त्यांना दरमहा पोटगी देण्याचे आदेश दिले होते. त्यातच त्यांना बेल्स पाल्सी हा दुर्मिळ आजारही जडला. त्यामुळे ते आता कुणालाही न सांगता मनःशांतीसाठी इगतपुरीच्या विपश्यना केंद्रात दाखल झालेत. ते तिथे मागील आठवड्याभरापासून आहेत.करुणा शर्मा यांनी यावेळी राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा रूपाली चाकणकर यांच्यावरही निशाणा साधला. राज्यात दिवसेंदिवस महिलांवरील अत्याचार व कुटुंबातील सदस्यांकडून होणाऱ्या मारहाणीच्या घटनांत वाढ होत आहे. पण राज्य महिला आयोग नेमके काय काम करतो हेच कळत नाही.

# धारावीचा पुनर्विकास एकात्मिक पद्धतीने करणार

**मुख्यमंत्री फडणवीस यांची ग्वाही**
**धारावी पुनर्विकास प्रकल्पाच्या बृहदब आराखड्याला मान्यता**



■ **महासागर प्रतिनिधी,**
**मुंबई, दि. ३० :**
धारावी हे देशातील वैशिष्ट्यपूर्ण उद्योग समूहांचे विस्तीर्ण क्षेत्र आणि महत्वाचे आर्थिक केंद्र आहे. त्यादृष्टीने धारावीच्या मूळ संकल्पनेचे जतन करत पर्यावरणपूरक आणि एकात्मिक पद्धतीने विकास करावा. स्थानिक कारागिरांच्या, व्यावसायिकांच्या पुनर्वसनाला धारावी पुनर्विकास प्रकल्पात सर्वोच्च प्राधान्य देऊनच प्रकल्प राबवावा, असे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले. फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली धारावी पुनर्विकास प्रकल्प आढावा बैठक पार पडली. या बैठकीत धारावी पुनर्विकास प्रकल्पाच्या बृहदब आराखड्याला मान्यता देण्यात आली.या बैठकीला उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे तसेच संबंधित सर्व वरिष्ठ अधिकारी, यंत्रणाप्रमुख उपस्थित होते. धारावीचा पुनर्विकास पर्यावरणपूरक आणि एकात्मिक पद्धतीने करावयाचा असून धारावीतील व्यावसायिक उलाढाल सर्वात महत्त्वाचा भाग आहे. त्याला प्राथिमकता देत या ठिकाणच्या गुणवंत कारागिरांना, त्यांच्या कौशल्य आधारित विविध व्यवसायांच्या पुनवर्सनास सर्वोच्च प्राधान्य देण्यात यावे. येथील मूळ रहिवासी असलेल्या प्रत्येकाला घर द्यायचे आहे. धारावीमधील प्रत्येकाला पुनर्वसन प्रकल्पात न्याय मिळाला पाहिजे. येथील प्रत्येकजण या पुनर्विकास प्रकल्पासाठी पात्र असणार आहे. त्याचे निकष वेगवेगळे असतील. मात्र धारावीतील प्रत्येकाला पुनर्वसनाचा लाभ मिळाला पाहिजे, याची खबरदारी घेण्यात यावी. ठरल्याप्रमाणे नियमानुसार पात्र लाभार्थ्यांना विकास प्रकल्पात देय असलेली जागा देण्यात यावी. धारावीची मूलभूत व्यावसायिक ओळख जपून, मूळ वैशिष्ट्यांना सुरक्षित ठेऊन धारावी विकास प्रकल्पाची संकल्पना राबवावी. यासाठी संबंधित यंत्रणांनी आवश्यक तो समन्वय ठेवावा. स्थानिक जनतेला विश्वासात घेऊन लोकभावना जपून समन्वयपूर्वक विकासाची कामे करावीत, असे निर्देश देवेंद्र फडणवीस यांनी यावेळी दिले. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी यावेळी सर्व संबंधित विभागांनी विकास प्रकल्पासाठी आवश्यक ती मान्यता, पुढील कार्यवाही तत्परतेने करण्याचे निर्देश दिले. धारावी पुनर्विकास प्रकल्पाचे मुख्य कार्यकारी अधिकारी एस. व्ही. आर. श्रीनिवास यांनी यावेळी सादरीकरणाद्वारे प्रकल्पाची सविस्तर माहिती दिली. बैठकीला महसूल विभागाचे अतिरिक्त मुख्य सचिव राजेश कुमार, गृहनिर्माण विभागाच्या अतिरिक्त मुख्य सचिव वल्सा नायर, मुख्यमंत्री कार्यालयाच्या प्रधान सचिव अश्विनी भिडे, उपमुख्यमंत्री कार्यालयाचे अतिरिक्त मुख्य सचिव असीम गुप्ता , प्रधान सचिव नवीन सोना, एमएमआरडीएचे आयुक्त संजय मुखर्जी, नियोजन विभागाचे अतिरिक्त मुख्य सचिव राजगोपाल देवरा, वित्त विभागाचे प्रधान सचिव सौरभ विजय, म्हाडाचे मुख्य कार्यकारी अधिकारी संजीव जयस्वाल यांच्यासह संबंधित यंत्रणांचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

## फरार आरोपी नीलेश चव्हाणला अखेर बेड्या

**नेपाळमधून आवळल्या मुसक्या**

■ **महासागर प्रतिनिधी,**
**पुणे, दि. २५ :** वैष्णवी हगवणे हुंडाबळी प्रकरणात प्रमुख आरोपींमध्ये समावेश असल्याचा आरोप केला जाणारा नीलेश चव्हाण याला पोलिसांनी ताब्यात घेतली आहे. नीलेश गेल्या काही दिवसांपासून फरार होता. मात्र आता त्याला नेपाळमधून पोलिसांनी अटक केली आहे. नीलेश चव्हाण याच्यावर बाळाची हेळसांड केल्याचा तसेच कस्पटे कुटुंबावर बंदूक रोखण्याचा देखील आरोप आहे. नीलेश चव्हाण याच्या अटकेनंतर आता या प्रकरणात अनेक खुलासे होण्याची शक्यता वर्तवली जात आहे. पुण्यातील वैष्णवी हगवणे मृत्यू प्रकरणाशी संबंधित प्रकरणात पीडित कस्पटे कुटुंबीयांना धमकावल्या प्रकरणी नीलेश चव्हाण या तरुणावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या तरुणावर वैष्णवीचे बाळ घेण्यासाठी गेलेल्या वैष्णवीच्या कुटुंबीयांना धमकावल्याचा आरोप आहे. तसेच त्याने त्याच्या पत्नीचा अमानुष छळ व तिचे आक्षेपार्ह व्हिडिओ तयार केल्याची संतापजनक बाब उजेडात आली आहे. या प्रकरणी गेल्या काही दिवसांपासून तो फरार होता. त्याला आता नेपाळमधून अटक करण्यात आली आहे. त्याला आज रात्रीपर्यंत पुण्यात आणले जाणार आहे.




**नीलेश चव्हाण हा करिष्मा हगवणेचा मित्र**

नीलेश चव्हाण हा वैष्णवी हगवणेचे पती शशांक हगवणे आणि बहिण करिष्मा हगवणे यांचा मित्र आहे. त्याची पार्श्वभूमी गुन्हेगारी स्वरुपाची आहे. त्याच्यावर त्याच्या पत्नीचा अमानुष छळ केल्याचा ठपका आहे. तो स्पाय कॅमेऱ्याच्या मदतीने आपल्या पत्नीचे आक्षेपार्ह व्हिडिओ चित्रित करायचा. या प्रकरणी त्याच्यावर २०१९ मध्ये पुण्यातील वारजे पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. आता याच ठाण्यात नीलेश चव्हाणवर वैष्णवी हगवणेचे बाळ मागण्यासाठी गेलेल्या तिच्या माहेरच्यांना पिस्तुल दाखवून धमकावल्याचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

**धुळ्यातील तरुणाकडून १.६९ लाखांचा गांजा जप्त**

**पुणे :** वाघोली पोलिसांनी गांजा विक्री करणाऱ्या एका तरुणाला अटक केली. वाघोली-लोहगाव रस्त्यावर ही कारवाई करण्यात आली. आरोपीकडून पोलिसांनी आठ किलो ४०२ ग्रॅम गांजा जप्त केला. धुळे जिल्ह्यातील शिरपूर तालुक्यातील हिसाळे येथील सुरेश साहेबराव पाटील (४४) याला पोलिसांनी अटक केली. वाघोली-लोहगाव रस्त्यावर गस्त घालणाऱ्या पोलिसांना पाटील गांजा विक्रीसाठी येणार असल्याची माहिती मिळाली. पोलिसांनी सापळा रचून त्याला पकडले. त्याच्याकडील पिशवीतून गांजा सापडला.

## जालिंदर सुपेकर म्हणतात-'तो मी नव्हेच'

**वैष्णवी प्रकरणात सर्व आरोप फेटाळले**

■ **महासागर प्रतिनिधी,**
**पुणे, दि. ३० :** वैष्णवी हगवणे हुंडाबळी आणि आत्महत्या प्रकरणातील आरोपी शशांक आणि सुशील हगवणे यांना शस्त्र परवाने दिल्याच्या आरोपाखाली पुण्यातील विशेष महानिरीक्षक (कारागृह) जालिंदर सुपेकर यांची चौकशी सुरू आहे. बनावट कागदपत्रे मंजूर करून परवाने देण्यात आल्याचा आरोप करण्यात येत आहे. पुणे पोलिसांनी या आरोपांची चौकशी सुरू केली असून दरम्यान गृह विभागाने गुरुवारी सुपेकर यांच्यावरील अतिरिक्त कारभार काढून घेण्यात आले आहेत. दरम्यान सुपेकर यांनी त्यांच्यावरील सर्व आरोप फेटाळले आहे. शस्त्र परवाना देण्याचा



माझ्याकडे अधिकारच नव्हता, असे देखील त्यांनी म्हटले आहे. या प्रकरणातील तपासात असे दिसून आले की, वैष्णवी हगवणे यांचा पती शशांक आणि दीर सुशील यांनी पुणे ग्रामीणमध्ये राहत असताना पुणे पोलिसांच्या हद्दीत राहण्याचा दावा करून खोटे कागदपत्रे सादर केली होती. त्यावेळी अतिरिक्त पोलिस आयुक्त म्हणून सुपेकर यांनी कागदपत्रांवर स्वाक्षरी केली आणि हगवणे बंधूंना शस्त्र परवाने दिले, असल्याचा आरोप होत आहे. हगवणे बंधू हे सुपेकर यांचे पुतणे आहेत. त्यामुळे हे प्रकरण चांगलेच चर्चे आले. आता सुपेकर यांनी हे आरोप फेटाळले आहेत. या संबंधीचे वृत्त टीव्ही -९ वृत्त वाहिनीने दिले आहे. दरम्यान सामाजिक कार्यकर्त्या अंजली दमानिया यांनी आता महाराष्ट्र सरकारची फसवणूक केल्याबद्दल सुपेकर यांच्याविरुद्ध फौजदारी खटला दाखल करण्याची मागणी केली आहे.

**'प्लंबर' नव्हे 'वॉटर इंजिनिअर' म्हणा!**

**नाशिक :** गत काही वर्षांपासून शहरांचे नाव बदलण्याचा मुद्दा चांगलाच गाजला. त्यावर राजकीय वतुर्ळात तीव्र प्रतिक्रियाही उमटल्या. पण हा विषय आता निकाली निघाला आहे. आत्ता सरकार अंगमेहनतीच्या व्यवसायांच्या नावांमध्ये बदल करण्याच्या दिशेने एक पाऊल पुढे टाकण्याच्या विचारात आहेत. राज्याचे कौशल्य विकास मंत्री मंगलप्रभात लोढा यांनी स्वतः तसे संकेत दिलेत.

मंगलप्रभात लोढा शुक्रवारी नाशिकच्या दौऱ्यावर होते. आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर तिथे त्यांनी भाजपचे स्थानिक पदाधिकारी व कार्यकर्त्यांशी संवाद साधला. त्यांना बुथ समिती, बूथ रचना आदींविषयी योग्य त्या सूचना केल्या. त्यानंतर पत्रकारांशी बोलताना त्यांनी सरकार प्लंबर्सचा उल्लेख वॉटर इंजिनिअर असा करण्याचा निर्णय घेण्याच्या विचारात असल्याचे स्पष्ट केले. मजुरांना सन्मान मिळावा यासाठी काही व्यवसायांच्या नावांत बदल केला जाणार आहे. त्यानुसार सरकार प्लंबरचा दर्जा किंवा नाव बदलून ते वॉटर इंजिनिअर करण्याच्या विचारात आहे.

## भाच्याने आत्याला दोन महिन्यांपासून साखळदंडात बांधून ठेवले

**पोलिसांनी केली महिलेची सुटका**



■ **महासागर प्रतिनिधी,**
**कोल्हापूर , दि. ३० :** कोल्हापूर जिल्ह्यातील राजारामपुरी येथे एक धक्कादायक घटना समोर आली आहे. एका चाळीस वर्षीय महिलेला तिच्या भाच्याने साखळदंडाने बांधून ठेवण्याचा प्रकार उघडकीस आला आहे. या घटनेची माहिती पोलिसांना मिळताच, क्राइम ब्रांच आणि राजारामपुरी पोलिस घटनास्थळी दाखल झाले आणि त्यांनी साखळदंडातून सदरील महिलेची सुटका केली आहे. याबाबत मिळालेल्या माहितीनुसार राजारामपुरी परिसरामध्ये एका महिलेला साखळदंडातून मुक्त करण्यात आले आहे. सारिका साळी असे या चाळीस वर्षीय महिलेचे नाव असून पोलिसांनी या महिलेची सुटका केली आहे. संबंधित महिला ही वेडसर असून रस्त्यावर फिरताना काहीही उचलून घेते आणि खाण्याचा प्रयत्न करते. त्यामुळे तिच्या घरच्या मंडळींनी तिला दोन महिन्यांपासून साखळदंडात बांधून ठेवले असल्याची माहिती समोर आली आहे. पोलिसांनी कुलूप फोडणाऱ्या व्यक्तीला बोलावून या महिलेची सूटका केली. सदरील महिला ही तिच्या भाच्याजवळ राहते. यात तिचा भाऊ आणि भावाची बायको म्हणजेच भावजय आणि भाचा हे सर्व एकत्र राहतात. मात्र गेल्या दीड ते दोन महिन्यांपासून या महिलेला साखळदंडात बांधून ठेवण्यात आले आहे. याप्रकरणी आरोपींवर गुन्हा दाखल करण्यात येत असून त्यांना लवकरच अटक केली जाणार असल्याची माहिती पोलिसांनी दिली. या घटनेची माहिती मिळतात शिवसेना ठाकरे गटाचे पदाधिकारी देखील घटनास्थळी पोहोचले होते. त्यांनी संबंधित महिलेला साखळदंडात बांधणाऱ्या आरोपींवर कडक कारवाई करण्याच्या मागणी केली आहे. शिवसेनेचे नेते संजय पवार यांनी यात सदरील महिलेला बांधून ठेवणाऱ्या भाच्याच्या देखील कानशिलात लगावली आहे. या प्रकरणी कडक कारवाई करण्याची मागणी त्यांनी पोलिसांकडे केली आहे.

# माझा मुलगा निर्दोष त्याला सोडून द्या!

**पाकसाठी हेरगिरी करणाऱ्या ठाण्यातील अभियंत्याच्या आईचा दावा**

■ **महासागर प्रतिनिधी,**
**ठाणे, दि. ३०:** महाराष्ट्र दहशतवाद पथकाने (एटीएस) मुंबईतील नौदलाच्या ठिकाणांची संवेदनशील माहिती पाकला पुरवल्याच्या आरोपाखाली रवी वर्मा नामक एका २७ वर्षीय अभियंत्याला बेड्या ठोकल्या आहेत. या तरुणाला सोशल मीडियाच्या माध्यमातून पाक गुप्तहेरांनी आपल्या जाळ्यात ओढल्याचा आरोप आहे. पण आत्ता त्याच्या आईने आपला मुलगा निर्दोष असल्याचा दावा करत त्याच्या सुटकेची मागणी केली आहे. तसेच पोलिस त्याच्या सुरू असणाऱ्या चौकशीसंबंधी कोणतीही माहिती देत नसल्याचाही आरोप केला आहे.




रवी वर्माची आई रेखा वर्मा शुक्रवारी एका वृत्तवाहिनीशी बोलताना म्हणाली की, माझ्या मुलाने काहीच केले नाही. त्याने मला फेसबूक बंद करण्याचा शब्द दिला आहे. तो निर्दोष आहे. पोलिसांनी त्याला सोडून द्यावे. सुरुवातीला माझ्या मुलाला चौकशीसाठी नेले तेव्हा मला त्याला पासपोर्टशी संबंधित कामानिमित्त नेत असल्याचे सांगण्यात आले. त्यानंतर त्यांच्या मागे माझा भाऊ गेला. मग माझी बहीणही गेली. त्यांनी माझ्या मुलाला दिवसभर थांबवून घेतले.

आम्हाला त्याची चौकशी सुरू असल्याचे सांगण्यात आले. पोलिस सकाळपासून सायंकाळपर्यंत त्याचा जबाब नोंदवत होते. त्याची नेमकी कोणती चौकशी सुरू आहे हे ही आम्हाला सांगण्यात आले नाही.

**रवी निर्दोष, त्याने काहीही चुकीचे केले नाही**

रेखा वर्मा पुढे म्हणाल्या, पोलिसांनी माझ्या मुलाला ताब्यात घेतले तेव्हापासून त्याचे आमच्याशी कोणतेही बोलणे झाले नाही. त्याने फक्त मला एवढेच सांगितले आहे की, आई मी फेसबूक बंद करेन. पोलिसांनी सुरुवातीला पासपोर्टचे कारण सांगून त्याला नेले. पण नंतर आम्हाला त्याला दहशतवाद विरोधी पथकाने ताब्यात घेतल्याचे समजले. आता आम्हाला भिती वाटू लागली आहे. माझ्या मुलाने काहीच चुकीचे केले नाही. तो निर्दोष आहे. मी त्याच्याशी बोलण्याचा प्रयत्न केला. पण ते शक्य झाले नाही. तो मला म्हणाला, आई हे पाकिस्तानवाले लोक... तो पुढे काही बोलायच्या आधी मी त्याला म्हणाले तू पहिल्यांदा ते काम सोडून दे. त्यानंतर माझा मुलगा मला न्यायालयात दिसला. त्याच्या हातात बेड्या होत्या. मला त्याची भेट घ्यायची होती. पण पोलिसांनी भेट घेऊ दिली नाही, असे त्या म्हणाल्या.

**काय आहेत रवी वर्मावर आरोप?**

यासंबंधीच्या माहितीनुसार, पाकला गोपनीय माहिती पुरवल्याच्या मोबदल्यात रवी वर्माच्या खात्यात एक मोठी रक्कम जमा करण्यात आली होती. मुंबईतील डॉकयार्डमध्ये कार्यरत असणारा आरोपी कर्मचारी एका पाकिस्तानी इंटेलिजन्स ऑपरेटिव्ह (पीआयओ) च्या संपर्कात होता. त्याच्या चौकशीत तो नोव्हेंबर २०२४ पासून फेसबुकच्या माध्यमातून पीआयओच्या संपर्कात असल्याचे स्पष्ट झाले. नोव्हेंबर २०२४ ते मार्च २०२५ पर्यंत त्याने व्हॉट्सएपद्वारे गोपनीय माहिती पाकला पुरवला. पोलिसांनी या प्रकरणी रवीसह त्याच्या संपर्कातील इतर २ जणांनाही अटक केली आहे.

# ढेकळांचे पंचनामे करायचे आहेत का?

**कृषिमंत्री माणिकराव कोकाटे यांचे वादग्रस्त वक्तव्य**

■ **महासागर प्रतिनिधी,**
**नाशिक , दि. ३० :** आपल्या वादग्रस्त वक्तव्यांसाठी आता ओळख निर्माण झालेले देवेंद्र फडणवीस सरकारमधील कृषी मंत्री माणिकराव कोकाटे यांनी पुन्हा एकदा असेच वादग्रस्त वक्तव्य केले आहे. अवकाळी पावसामुळे झालेल्या नुकसानीची पाहणी करताना शेतकऱ्यांच्या बांधावर गेलेले माणिकराव कोकाटे यांनी शेतकऱ्यांना प्रतिप्रश्न केला आहे. काढलेल्या पिकाचा पंचनामा केला जाणार नाही. तिथे ढेकळांचे पंचनामा करायचे आहे का? असा प्रतिप्रश्न त्यांनी शेतकऱ्यांना विचारला आहे. देवेंद्र फडणवीस सरकारमधील कृषी मंत्री माणिकराव कोकाटे यांचे वारंवार वादग्रस्त वक्तव्य समोर आले आहे. यातच आता अवकाळी पावसामुळे त्रस्त झालेल्या शेतकऱ्यांना डिवचणारे वक्तव्य माणिकराव कोकाटे यांनी केले आहे. शेतकऱ्यांच्या बांधावर शेत परिस्थितीची पाहणी करण्यासाठी गेलेले कोकाटे यांनी शेतकऱ्यांना प्रतिप्रश्न केला आहे. केवळ नुकसान



झालेल्या पिकांचे पंचनामे होतील. काढून ठेवलेल्या पिकाचे पंचनामे होणार नाहीत. शेतातील ढेकळांचे पंचनामे करायचे का? असा प्रतिप्रश्न माणिकराव कोकाटे यांनी उपस्थित केला आहे. त्यामुळे आता वाद वाढण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

**कृषिमंत्री आहेत की शेतकऱ्यांचे शत्रू -रोहित पवार**

रोहित पवारांनी कृषिमंत्र्यांच्या या या विधानाचा चांगलाच समाचार घेतला आहे. ते म्हणाले, नेहमी वादग्रस्त विधानं करणारे मंत्री हे राज्याचे कृषिमंत्री आहेत की शेतकऱ्यांचे शत्रू आहेत, हेच समजत नाही. पावसामुळं झालेल्या नुकसानीने उध्वस्त झालेल्या शेतकऱ्याला दिलासा देण्याऐवजी ढेकळाचे पंचनामे करायचे का? असं संतप्त विधान करुन अडचणीत असलेल्या शेतकऱ्यांच्या जखमेवर मीठ चोळण्याचं काम हे कृषिमंत्री महाशय करत आहेत.

महासागर
शनिवार, दि. 31 मे 2025
अमरावती
पान 3




# नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना तातडीने देणार भरपाई



**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती, ( दि. 30 ) -** जिल्ह्यात एप्रिल आणि मे मध्ये झालेल्या अवकाळी पाऊस आणि वादळाने शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. नुकसान झालेल्या बाधित शेतकऱ्याना तातडीने नुकसान भरपाई मिळवून देण्यासाठी प्रयत्न करण्यात येतील.

या बाबत नुकसानीचे पंचनामे तातडीने करण्यात येऊन या बाबतचा प्रस्ताव मंत्रालय स्तरावर सादर करावा, याचा निधी प्राप्त करून नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना तातडीने भरपाई देण्यात येणार आहे, अशी माहिती महसूल मंत्री तथा पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिली. पालकमंत्री बावनकुळे यांनी एप्रिल आणि मे महिन्यात झालेल्या नुकसानीचा आढावा घेतला. बाधितांना तातडीने नुकसान भरपाई व्हावी, यासाठी प्रस्ताव सादर करण्याचे काम तातडीने हाती घेण्यात यावे, असे निर्देश विभागीय आयुक्तांना व जिल्हाधिकारी यांना दिले आहे.

### 1174 गावे बाधित

एप्रिलमध्ये अवकाळी पाऊस आणि वादळामुळे जिल्ह्यातील 1 हजार 174 बाधित गावामधील 794 हेक्टर केळी, संत्रा, पपई, कांदा आणि गहू शेतीचे नुकसान झाले आहे. यात अंदाजे 2 कोटी 83 लाख रुपयांचे नुकसान झाले आहे. तसेच मे मध्ये 325 गावामधील 13 हजार 639 हेक्टर मूग, तिळ, केळी, संत्रा, पपई, कांदा, ज्वारी, लिंबू पिकांचे प्राथमिक अंदाजानुसार नुकसान झाले आहे. या नुकसानीचे पंचनामे करण्याची कार्यवाही सुरू आहे. मे मध्ये वीज पडून 3 मनुष्य जीवित हानी झाली आहे, तर घरांच्या नुकसानीत एप्रिल मध्ये अंशत: 18 आणि 1 घराचे पूर्ण नुकसान झाले आहे. मे मध्ये 741 घरांची पडझड झाली असून 14 घरांचे पूर्णत: पडझड झाली आहे. 12 गोठे आणि झोपडीचे नुकसान झाले आहे. मे मध्ये 29 लहान जनावरे आणि 12 मोठे पशूधन मृत झाले आहे. मृत व्यक्तींच्या वारसांना सानुग्रह अनुदान आणि मृत जनावरांच्या मालकांना पशुधन सहाय्य अनुदान वाटपाची प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. जिल्हा प्रशासनाने नुकसानीची तीव्रता लक्षात घेऊन, पंचनामे आणि मदत कार्याला गती दिली असून बाधित शेतकऱ्यांना आणि नागरिकांना लवकरात लवकर मदत मिळावी यासाठी प्रशासन पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या कडून निर्देश देण्यात आले आहे .

### महसूल मंत्री तथा पालकमंत्री अमरावती चंद्रशेखर बावनकुळे

### नुकसान भरपाईचा प्रस्ताव सादर करण्याचे निर्देश

# नागपूर येथील वॉन्टेड आरोपी अमरावतीत अटकेत

### राजापेठ पोलिसांची कामगिरी



**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती, ( दि.30 ) -** नागपूरच्या इमामवाडा पोलीस ठाण्यातील वॉन्टेड आरोपीला अमरावती येथील म्हाडा कॉलनी परिसरात अटक करण्यात आली. हिमांशु दिनेश रॉय (वय 22 वर्षे, राहणार इंदिरा समर, जुनी रेल्वे लाईनजवळ, इमामवाडा, नागपूर) असे आरोपीचे नाव आहे. आरोपीला नागपूर पोलीस ठाण्याला हस्तांतरित करण्यात येणार आहे.

राजापेठ पोलीस स्टेशनचे वरीष्ठ पोलीस निरीक्षक पुनीत कुलट यांना गुप्त बातमीदाराकडून माहिती मिळाली की, नागपूर येथील इमामवाडा पोलीस ठाण्याचा एक गंभीर गुन्ह्यांमध्ये फरार आरोपी अमरावतीतील म्हाडा कॉलनी परिसरात लपून आहे. या माहितीनुसार, पीआय पुनीत कुलट यांनी डिटेक्शन ब्रँच पथकाला पाचारण करून स्वत:सह पथकासमवेत म्हाडा कॉलनी येथे छापा टाकला. छाप्यामध्ये संशयास्पद स्थितीत आढळलेल्या व्यक्तीला ताब्यात घेतले गेले. त्याने आपले नाव हिमांशु दिनेश रॉय असे सांगितले. पुढील चौकशीत आरोपीवरील गंभीर गुन्ह्यांमध्ये फरार असल्याचे स्पष्ट झाले आहे.

### इमामवाडा पोलीस ठाण्यात सहा गुन्हे आहेत दाखल

आरोपी हिमांशु रॉय याच्यविरुध्द नागपूरच्या इमामवाडी पोलिस ठाण्यात कलम 4/25 शस्त्र अधिनियम, भादंविच्या कलम 307, 384, 34 सह 4/25 आर्म्स ॲक्ट, कलम 142 महाराष्ट्र पोलीस कायदा, शस्त्र अधिनियम 3/25, 4/25 व कलम 135 म.पो.का., भादंविच्या कलम 206, 324(4), 351(3), 189(4), 190, 15/1(2), 191(3), भादंविच्या कलम 296, 324(4), 351(3), 189(4), 190, 191(2), 181(3) असे एकुण सहा गुन्हे दाखल आहेत.

# दोन सराईत गुन्हेगारांना अटक

### अमरावती गुन्हे शाखेची कारवाई



**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती,( दि.30 ) -** शहरातील गुन्हेगारीला आळा घालण्यासाठी अमरावती पोलिसांनी सुरू केलेल्या मोहीमेअंतर्गत गुन्हे शाखा युनिट क्र. 01 ने दोन महत्त्वाच्या कारवाया करत दोन रेकॉर्डवरील गुन्हेगारांना अटक केली आहे.

### चाकूने दहशत माजवणारा आरोपीही ताब्यात

दुसऱ्या कारवाईत, लालखडी परिसरात चाकूने दहशत माजवत असलेला शरीफ बेग रशीद बेग (30, रा. वाटर सप्लाय) यास नागपूरी गेट पोलिसांच्या हद्दीत गुप्त माहितीच्या आधारे अटक करण्यात आली. आरोपीविरोधात भारतीय हत्यार कायद्यानुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या कारवाया पोलीस आयुक्त अरविंद चावरिया, उपआयुक्त कल्पना बारवकर, परिमंडळ 1 चे उपआयुक्त सागर पाटील, आणि सहाय्यक आयुक्त अरुण पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली कारवायांमध्ये पो.नि. गोरखनाथ जाधव, सपोनि मनीष वाकोडे, पोउपनि. प्रकाश झोपाटे, तसेच गुन्हे शाखेचे कर्मचारी सचिन बहाळे, अलीमउद्दीन खतीब, नाझीमुद्दीन सय्यद आदींचा सक्रिय सहभाग होता.

### 6.46 लाखांच्या चोरीप्रकरणी चोरटा जेरबंद

यवतमाळ जिल्ह्यातील अवधूतवाडी पोलीस ठाण्यात दाखल असलेल्या घरफोडी प्रकरणात सैयद नुर सैयद गफार उर्फ नुरा (45, रा. अकबर नगर) या सराईत चोरट्यास चांदणी चौकातून अटक करण्यात आली. फिर्यादी प्रंशात जाधव यांच्या तक्रारीवरून दाखल गुन्ह्यात साडेनऊ तोळे सोनं व दोन तोळे चांदीचे दागिने, एकूण 6 लाख 46 हजार रुपयांचा मुद्देमाल चोरीस गेला होता. नुराचा गुन्हेगारी इतिहास लक्षात घेऊन पोलिसांनी सापळा रचून त्याला अटक केली.

## शहरात प्रतिबंधात्मक आदेश लागू

**अमरावती -** शहरात शांतता व सुव्यवस्था अबाधित राहावी, यासाठी अमरावती शहर पोलीस आयुक्त यांनी महाराष्ट्र पोलिस कायदा कलम 37 (1) आणि (3) नुसार प्रतिबंधात्मक आदेश जारी केला आहेत. सदर प्रतिबंधात्मक आदेश शहरातील कायदा व सुव्यवस्था अबाधित राहावी, याकरिता पोलिस आयुक्तालयाच्या परिक्षेत्रात दि. 1 जून ते 15 जून 2025च्या मध्यरात्रीपर्यंत लागू राहील. या आदेशाचा भंग करणाऱ्या व्यक्तींविरूद्ध कायदेशीर कारवाई करण्यात येणार आहे, असे पोलीस आयुक्त अरविंद चावरीया यांनी कळविले आहे.

## पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांचा आज दौरा

**अमरावती -** पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे 31 मे रोजी जिल्ह्याच्या दौऱ्यावर येत आहेत. बावनकुळे दुपारी 1 वाजता जिल्हाधिकारी कार्यालयातील नियोजन भवनात पारधी बांधवांना ट्रॅक्टर आणि ऑटो वाटप कार्यक्रमास उपस्थित राहतील. त्यानंतर दुपारी 2 वाजता डॉ. नरेंद्र भिवापूरकर अंध विद्यालयात भारतीय कृत्रिम अंग निर्माण निगम (एलिम्को) आणि जिल्हा प्रशासनाच्या वतीने राष्ट्रीय वयोश्री योजनेंतर्गत लाभार्थ्यांना जीवनसहायक उपकरण वितरण शिबिराच्या उद्घाटनाला उपस्थित राहतील.




आरएनआय ४६९७५/१९८५ महासागर अमरावती
मालक, मुद्रक, प्रकाशक श्रीकृष्ण तनसुखदास चांडक यांनी अरूणोदय प्रेस, कॉटन मार्केट, नागपूर १८ येथे छापून दैनिक महासागर कार्यालय, होटल टूरिस्टच्या बाजूला रेल्वे स्टेशन चौक, अमरावती येथे प्रकाशित केले. संपादक -श्रीकृष्ण तनसुखदास चांडक ( पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांच्यावर राहील ) अमरावती मुख्य कार्यालय, पत्ता. दैनिक महासागर, होटल टूरिस्टच्या बाजूला रेल्वे स्टेशन चौक अमरावती, फोन नं. ९५१८९३४५०४

'कसं काय पाटील, बरं हाय का, काल काय ऐकलं ते खरं हाय का?' या गाण्याने तमाशातील तमासगीर महिला नाचत असताना, समोर बसलेला पाटील आपल्या मिशीला ताव देऊन डोक्यावरील फेटा हवेत भिरकावत असतो. तसेच खूश होऊन तोंडात बोट घालून शीळ फुंकतो, नोटांचा पाऊस तमासगीर महिलेच्या अंगावर पाडत असतो. कारण आपल्या नृत्यशैलीने व अदाकारीने तिने पाटलाचे मन जिंकलेले असते. पण बैलासमोर एक 'पाटलीण' नाचून पैसे मिळवित असेल, तर अशी पाटलीण आपल्याला नको आहे. होय, मला त्या कार्यक्रमाचे पूर्ण पैसे मिळाले होते. त्यावेळीही माझ्या टीमचा हगवणेंशी संबंध आला होता. बाकी प्रकरणाशी माझा काही संबंध नव्हता, असे तमासगीर गौतमी पाटीलचे वाक्य खरे आहे, त्याबद्दल दुमत नाही. पण अशी ही नाचणारी पाटलीण पाटलांपुढे किंवा कुणापुढेही नाचली असती तर तिच्या कलेला मानले असते. पण एका महिलेचा बळी घेणाऱ्या एका 'मानवी बैला'ने तिला चक्क बैलापुढे नाचायला लावले आणि पैशासाठी तीही खुशाल नाचते हे मात्र पटले नाही. उद्या पैसे फेकून कुत्र्यांची फौज आणून कुत्र्यासमोर देखील नाचायला लावतील. मग पैशासाठी कुत्र्यांसमोर देखील नाचायचे का? राज्यात सध्या वैष्णवी हगवणे प्रकरण गाजत आहे. वैष्णवी प्रकरणात रोज नवनवे खुलासे होत असताना काही दिवसांपूर्वी एक व्हिडीओ व्हायरल झाला होता. या व्हिडीओत राजेंद्र हगवणे यांनी आपल्या बैलाच्या वाढदिवसानिमित्त आयोजित केलेल्या कार्यक्रमात गौतमी पाटील चक्क बैलासमोर नाचली होती. हगवणे कुटुंबासोबत माझा संबंध फक्त त्या कार्यक्रमापुरता मर्यादित होता. मी एक कलाकार आहे. कलाकाराने एखादा प्रोग्राम केला म्हणून लगेच त्याचा पुढील घटनांशी जोडणं अतिशय चुकीचं आहे, हे तिचे म्हणणे योग्यच आहे. पण तिची कला पाहण्यासाठी जर तिला बैलापुढे नाचावे लागत असेल, तर त्या कलेला अर्थ तरी काय राहिला?
या पूर्वी यापूर्वी गौतमी पाटील हिचा कार्यक्रम यशाच्या शिखरावर गेल्यानंतर तिच्या या 'पाटील' आडनावाला काहींनी आक्षेप घेतला होता. त्यावेळी समाजातील सर्वांनी तिला पाठिंबा देऊन तिच्या कलेला मान दिला होता. पण तिला बैलांपुढे नाचताना पाहून 'हीच का ती सुंदर अदाकारी सादर करणारी गौतमी पाटील?' हा आता मात्र प्रश्न पडला. नाचणारी महिला कोण असेल? तिची जात काय असेल? तिचे आडनाव काय असेल? याची फिकीर गादीवर बसलेल्या व तक्क्याला रेललेल्या पाटलाला कशी काय असणार? कारण शेवटी तो पाटील असतो. पण नाचणारी बाईच 'पाटलीण' असेल, तर हाच 'पाटील' मागे बिघडायला लागला होता. याचा अर्थ समाजाने काय घ्यावा? नाचणाऱ्या बायका बघताना विविध जातीतील पुरुषांना कधीच काही वाटले नाही. पण मागे एकदा एक 'पाटील' आडनावाची बाई नाचते, म्हणून एका गावच्या पाटलांनी आकांडतांडव केला होता. आता तर पाटलीण चक्क बैलापुढेच नाचते, मग आता काय करणार? याचाच अर्थ असा की, नाचणारी बाई आम्हाला पाहिजेच, पण ती 'पाटलीण' नको. ती कोणत्याही जातिधर्माची चालेल, पण आपल्या जातीची कधीच असता कामा नये. तिने माणसांपुढेच काय जनावरांपुढे नाचले तरी चालेल, पण ती पाटलीण नसावी. निदान तिचे आडनाव तरी 'पाटील' नको आहे. आता या पाटलाला कोण सांगणार की, माणसाला जात असते, पण त्या माणसाच्या पोटाला जात नसते.







# बैलापुढे नाचणाऱ्या 'पाटलीणीची कला' काय कामाची?




जयंत महाजन
jayantmahajansir@gmail.com
मोबा. ९४२०६९१४२०

मुळातच जुन्या काळापासून पाटलाची एक स्वतंत्र प्रतिमा आहे. तमाशाप्रधान चित्रपटाने ती अधिक ठसठशीत केली. त्यामुळे बायका कुणी नाचवाव्यात तर पाटलांनीच, असे म्हटले जायचे; परंतु आता पाटील नावाची बाई बैलापुढे नाचते म्हटल्यानंतर पाटलांचा अहंकार का दुखावला नाही?

म्हणूनच गौतमी पाटील नाचायला चालेल, पण तिने तिचे आडनाव नेमके काय आहे, याचा पंचनामा करायला पाटील सरसावले होते. त्यामुळेच निदान तिने आडनाव तरी बदलावे, अशी अजब मागणी करून काही पाटलांनी आपल्या मिशीला ताव दिला होता. वर्षभरापूर्वी गौतमी पाटीलने आपले पाटील आडनाव बदलावे म्हणून काही पाटलांनी आकांडतांडव केले होते. समजा, गौतमीने पाटील आडनाव बदलून दुसरे काहीही लावले तरी त्याने फरक काय पडणार होता?

तिच्या पोटासाठी तिला नाचावे लागणारच आहे. स्त्रियांच्या बाजूने विचार करणाऱ्या प्रत्येकाने याबाबतीत विचार केला पाहिजे की, आडनाव बदलण्याची मागणी योग्य वाटते का? ही कोणत्या प्रकारची मानसिकता? जी बाई दररोज आपल्यासमोर नाचते, तिने आजही नाचलेच पाहिजे, उद्याही नाचलेच पाहिजे, फक्त आडनाव बदलले पाहिजे. अशा प्रकारची मागणी फक्त जात्यंध लोकच करू शकतात. आपल्या दिलखेचक अदांनी तरुणांना घायाळ करणारी व राज्यभर प्रत्येक कार्यक्रम 'हाउसफुल' गर्दीने खेचणारी ही 'पाटलीण' अचानक वादात का सापडावी? तर तिने बैलासमोर केलेले नृत्य होय.

विशेष म्हणजे हगवणे नावाच्या एका पाटलानेच दिला भरपूर पैसे देऊन आपल्या बैलाच्या समोर नाचविले व ती देखील नाचली. गौतमीचा कार्यक्रम अन् राडा झाला नाही, असे कधीच झाले नाही. पण यात तिचा दोष काय? पोलिसांचे कामही वाढू लागले आहे, हे मान्य करावेच लागेल. त्यांनाही लाठीमार केल्याशिवाय राहवत नाही.

तरुणाई पागल झाल्यासारखी दिसते. त्यामुळे पाटील नावाभोवती वादळ निर्माण करण्याचा प्रयत्न झाला होता. आडनाव बदलून काय साध्य होणार आहे? एखाद्या बाईला पुरुषी वासनेसाठी नाचावे लागणे, हेच मुळापासून बंद व्हावे, असे सर्वच पुरुषांना का वाटत नाही? 'पाटील' आडनावाच्या बाईने नाचू नये, असे एखाद्या 'पाटला'ला वाटत असेल, तर त्या पाटील बाईची आर्थिक स्थिती सुधारण्यासाठी या पाटलांनी पुढे यायला काय हरकत आहे?

निदान तिच्यावर नाचून पोट भरायची वेळ तरी येणार नाही. पाटील नाव लावू नये, असे म्हणणेच मुळात वेडेपणा ठरला होता. पाटील आडनाव लावू नये अशी मागणी काही संघटनांकडून मागे झाली होती. अनेक पुरोगामी संघटनांकडून त्यास विरोधही झाला होता. कारण पाटील ही एक उपाधी असून, पाटील, इनामदार, सरपोतदार, देशपांडे, कुलकर्णी, नाडकर्णी, देसाई ही जुन्या काळात गावं सांभाळणारी माणसे होती.

पूर्वी अशीच आडनावे होती. या आडनावांमुळे अनेकदा गफलत झाल्याचे प्रकारही घडले आहेत. त्यामुळे पाटील हे आडनाव कुठल्याही जातीची मक्तेदारी समजण्याचे काहीच कारण नाही. आता प्रश्न गौतमी पाटीलचे आडनाव पाटील का? पाटील असेल तर तिने नाचावे का? माणसं समोर नसताना आता बैलाच्या समोर देखील नाचावे का? असा प्रश्न निर्माण झाला आहे.

मुळात मुद्दा नाचण्याचा नाही, तर मुद्दा पुरुषसत्तेचा आहे. या सर्व प्रकारामुळेच आपल्या देशात बलात्कारित स्त्रीकडेसुद्धा अशाच घाणेरड्या पद्धतीने बघतात. तिची जात शोधतात आणि मग काय काय करायचे, हे ठरवतात. अनेक ठिकाणी तर दुसऱ्या जातीच्या बाईवर अत्याचार झाला तर यांना काहीच वाटत नाही.

आपल्या जातीच्या बाईवर तिच्या जातीपेक्षा खालच्या जातीच्या पुरुषाने अत्याचार केला असेल, तर मग वस्त्या जाळायला हे मोकळे. आडनाव बदलून नाचा असे ज्या बाईला सांगितले जात आहे, तिनेसुद्धा याबाबत स्पष्टपणे व्यक्त व्हायला हवे. 'सबसे कातिल गौतमी पाटील' अशी टॅगलाइन तिच्याबाबतीत वापरताना लोकांना मजा येते. गौतमीचे आडनाव पाटील नसेलही, पण ती माणूस तर आहे ना?

पाटील आडनावालाच काही संघटनांनी विरोध केला होता, तरी त्याला काहीही अर्थ नाही. गौतमीचे खरे आडनाव पाटील नसून 'चाबुकस्वार' आहे. पण तिची कला तर स्वतःचीच आहे ना?

या कलेमुळेच तिला महिन्याकाठी पाच-पन्नास लाख रुपये मिळतात. सर्वसामान्य घरातील महिलेला केवळ तिच्या कलेमुळे पैसा मिळत असेल, तर लोकांचा पोटशूळ का उठावा? आता गौतमीनेही 'मी पाटीलच आहे आणि हे नाव मी वापरणारच,' असे बाणेदार उत्तर दिल्यामुळे अनेकांचा मुखभंग झाला असेल.

पण खरं कारण म्हणजे तिच्या कार्यक्रमांना होणारी गर्दी काही थांबायचे नाव घेत नाही. पण तिला पैशाचा हव्यास इतका वाढला की, आपली कला, आपली अदाकारी बैलांपुढे, कुत्र्यापुढे सादर करू नये. मला फक्त पैशाचीच घेणे आहे ही तिची वृत्ती मात्र समाजाला खटकली आहे.

एवढा प्रचंड पैसा मिळत असताना प्राण्यांपुढे नाचायला लावत लावले जात असेल, तर त्या कलेला तरी काय अर्थ आहे? गौतमी पाटीलला समाजाने नेहमी पाठिंबा दिला. पत्रकारही तिच्या पाठीशी ठाम उभे राहिले होते. परंतु वैष्णवी प्रकरणातील हगवणे परिवारातील मानवी बैलांनी तिला 'बैला'पुढे नाचवून तिची प्रतिष्ठा देखील मातीमोल करून टाकली!

## गौतमीची पैशाची 'हाव' व हगवणेंचा पैशाचा 'माज'

संपूर्ण महाराष्ट्राला वेड लावणारी डान्सर गौतमी पाटीलची क्रेझ दिवसेंदिवस वाढत चालली होती. गौतमी पाटीलनं तिच्या डान्सनं साऱ्यांना आपल्या तालावर नाचवलं. महाराष्ट्रात प्रत्येक ठिकाणी तिची एक झलक पाहण्यासाठी पाहण्यासाठी तुफान गर्दी होते. त्यामुळे गौतमी या ना त्या कारणामुळे कायमच चर्चेत असते. गौतमीला फॉलो करणाऱ्यांची आणि कार्यक्रमांना गर्दी करणाऱ्यांची संख्या दिवसेंदिवस वाढत आहे. तिच्या कार्यक्रमात तरुण बेभान होऊन डान्स करतात. तरी तिच्या कार्यक्रमांची गर्दी काही कमी होत नाही.काही ठिकाणी तिच्या कार्यक्रमाला विरोध होतो, तर काही ठिकाणी अबालवृद्धांपासून सगळेच तिच्यासोबत ठेका धरतात. महाराष्ट्राच्या ग्रामीण भागात गौतमीचा मोठा चाहता वर्ग आहे. छोट्या गावातही गौतमी पाटीलच्या डान्सची क्रेझ पाहायला मिळते. हजारोंच्या संख्येने प्रेक्षक गौतमीच्या कार्यक्रमाला येतात. तरुण बेभान होऊन नाचतात. गौतमीच्या कार्यक्रमात नेहमी गोंधळाची परिस्थिती निर्माण होते. काही ठिकाणी पोलीस देखील बोलवावे लागतात. गौतमी पाटील ही लावणीच्या नावाखाली अश्लील डान्स करत असल्याचा आरोप तिच्यावर करण्यात येतो. तिच्या आडनावावरूनही वाद सुरु झाला होता. त्यावेळी रसिकांनी व समाजाने तिची पाठराखण केली होती. आता वैष्णवी हगवणे प्रकरणात तिने हगवणे परिवाराच्या माजमौजेसाठी चक्क बैलापुढे नृत्य सादर केले होते. अर्थात 'हे' प्रकरण घडण्यापूर्वीची ती घटना आहे. पण या निमित्ताने गौतमीची पैशाची 'हाव' व हगवणे परिवाराला असलेला पैशाचा 'माज' समाजापुढे आला.

# पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर



आज ३१ मे, आज पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांची ३०० वी जयंती. ३०० वर्षापूर्वी आजच्याच दिवशी म्हणजे ३१ मे १७२५ रोजी अहमदनगर जिल्ह्यातील जामखेड तालुक्यातील चोंडी या गावी माणकोजी व सुशिलाबाई शिंदे या दाम्पत्यापोटी अहिल्यादेविंचा जन्म झाला.

अतिशय छोट्या आणि सामान्य कुटूंबात जन्मलेल्या अहिल्यादेवी यांनी इतिहासात मानाचे स्थान प्राप्त केले आहे. ज्या काळात स्त्रियांना शिक्षणास बंदी होती, चूल आणि मूल हेच स्त्रियांचे जीवन होते, स्त्रियांनी घराचा उंबरठा ओलांडणे म्हणजे पाप समजले जात त्याकाळात त्यांच्या वडिलांनी त्यांना लिहायला, वाचायला शिकवले. मराठ्यांच्या इतिहासातील पराक्रमी समजल्या जाणाऱ्या होळकर घराण्यातील सुभेदार खंडेराव होळकर यांच्याशी वयाच्या आठव्या वर्षी त्यांचा विवाह झाला.

खंडेरावांपासून त्यांना मालेराव आणि मुक्ताबाई अशी दोन अपत्ये झाली. पण वयाच्या अवघ्या २८ व्या वर्षी त्यांना वैधव्यास सामोरे जावे लागले. पती खंडेराव हे कुंभेरीच्या लढाईत धारातीर्थी पडल्यावर त्यावेळच्या सनातनी लोकांनी त्यांच्यावर सती जाण्यासाठी दबाव आणला पण सासरे सरदार मल्हारराव होळकर यांनी या अमानवी, सनातनी परंपरेला विरोध करून अहिल्यादेवींना सती जाण्यापासून परावृत्त केले. आपल्या सासऱ्यांच्या इच्छेनुसार त्यांनी सती जाण्याचा विचार सोडून दिला.

अहिल्यादेवींची राजकीय कारकीर्द तेंव्हापासूनच सुरू झाली. खंडेरावांची जागा अहील्यादेवींनी घेतली. मल्हारराव देशभर मोहिमांवर व्यस्त असत त्यावेळी मल्हारराव आणि अहिल्यादेवींमध्ये पत्रव्यवहार होत. सासरा - सुनेमधील पत्रव्यवहार हा अहिल्यादेवींच्या राजकीय विचारकतेचा उत्कृष्ट नमुना होय. मोहीमेवर असताना मल्हारराव प्रजा रक्षणाच्या सूचना अहिल्यादेवींना जसे देताना दिसतात तसेच अहिल्यादेवी आपल्या सासऱ्यांना देताना दिसतात. सासरा सुनेचे ऐकल असा तो काळ नव्हता....आता ही नाही...

पण मल्हाररावांसारखा मुत्सदी अहिल्यादेवींचा सल्ला अंमलात आणत यावरुनच अहिल्यादेवींची योग्यता लक्षात येते. मल्हारराव मोहिमेवर असत तेंव्हा स्वतः अहिल्यादेवी राज्याचा बंदोबस्त चोख राखीत. मल्हाररावांच्या सूचनेप्रमाणे त्या कारभार करीत. १७६६ साली मल्हाररावांचे वृद्धापकाळाने निधन झाले.

दरम्यानच्या काळात अहिल्यादेवींनी स्त्रियांना लष्करी प्रशिक्षण देणारे महाविद्यालय सुरू केले. ज्या काळात स्त्रियांना घराबाहेर पडायला बंदी होती त्याकाळात त्यांनी स्वतःची ५०० महिलांची पलटण उभी केली. अहिल्यादेवींचे प्रशासन ब्रिटिशांनाही आदर्शभूत ठरले.

सर्व देशात जेंव्हा दांडगाईचे राज्य होते, कोणाचा कोणाला पायपोस नव्हता त्याकाळात सुरळीत चालणारे एकमेव राज्य म्हणजे अहिल्यादेवींचे राज्य. अहिल्यादेवी या दानशूर, कर्तृत्वत्वान, धर्मपारायण व कार्यक्षम राज्यकर्त्या म्हणून ओळखल्या जात असल्या तरी त्यांची राज्यकारभारावर प्रशासकीय पकड घट्ट होती. त्यांच्या वडिलांनी लहानपणी दिलेल्या शिकवणुकीचा आणि सासरे मल्हारराव यांनी दिलेल्या राजकीय कारभाराच्या तालमीचा त्यांना उपयोग झाला.

त्या सामान्य कुटुंबातील असल्यामुळे त्यांना प्रजेच्या अडीअडचणीची जाणीव होती. त्यांचे राहणे अतिशय साधे व सात्विक होते म्हणूनच त्यांना पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर असे नाव पडले. अहिल्यादेवींनी देशभर भ्रमंती केली. देशभ्रमण करताना तिर्थक्षेत्रांच्या जागी त्यांनी धर्मशाळा बांधल्या. शेकडो मंदिरांचा जिर्णोद्धार केला.

जवळपास २८ वर्ष त्यांनी राज्यकारभाराचा गाडा सैन्याच्या सहकार्याने अतिशय कुशलपणे चालवला. कोणतेही कर्ज न काढता राज्याची तिजोरी भक्कम करून त्यांनी प्रजाहिताकडे लक्ष दिले. आदर्श राज्यकारभार कसा करावा याचा वस्तुपाठच अहिल्यादेवींनी घालून दिला. अहिल्यादेवी होळकर हे नाव इतिहासात अमर झाले.

बाई काय राज्यकारभार करणार ही सनातनी अटकळ त्यांनी खोटी ठरवली. १३ ऑगस्ट १७९५ रोजी अहिल्यादेवींचे निधन झाले. प्रजाहितदक्ष, आदर्श राजकर्ती म्हणून इतिहासात अजरामर झालेल्या पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांना जयंतीदिनी विनम्र अभिवादन!



श्याम ठाणेदार
दौंड. जिल्हा पुणे.
९९२२५४६२९५

## हा दुजाभाव का?

वाचक लिहितात

संविधानातील तरतुदीनुसार धार्मिक संस्थाना देणगी देण्यापासून कोणलाही रोखता येणार नाही. जसे हिंदू आपल्या मंदिरांना देणगी देतात तसे अन्य पंथीय देखील आपल्या प्रार्थना स्थळांना देणग्या देत असतात. या देणग्या अनेकदा परदेशातूनही येतात. देणगीरूपाने दिले जाणारे धन हे धार्मिक कार्यासाठी वापरले जावे ही भावना त्या प्रत्येक अर्पण दात्यांची असते. पूर्वीचे राजे-महाराजे आपल्या मिळकतीचा काही भाग मंदिरांना अर्पण स्वरूपात देत असत आणि मंदिरे या धनातून राज्यातील मुलांच्या व्यवहारिक, धार्मिक आणि युद्धकलेच्या शिक्षणासाठी गुरुकुल चालवत, गोशाळांत गोमातांचे संवर्धन करत. राजाच्या आणि जनतेच्या कल्याणासाठी यज्ञयागादी विधी करत. धर्माने आखून दिलेली ही जीवनपद्धती युगोनुयुगे सुरु होती यातूनच काही प्राचीन मंदिरे आजही धनधान्याने समृद्ध आहेत.

मंदिरांच्या या समृद्धतेचा लाभ घेत सरकारने देशातील जवळपास सर्वच प्रमुख मंदिरे 'मंदिर अधिग्रहण कायद्या'च्या गोंडस नावाखाली ताब्यात घेतली आहेत. या मंदिरांवर सरकारी अधिकारी नेमले आहेत. जनतेने आपल्या मिळकतीचा काही भाग कररूपाने सरकारला द्यावा आणि सरकारने या कराच्या पैशातून जनतेला सोयीसुविधा उपलब्ध करून द्याव्यात याच मूळ सूत्रावर लोकशाही शासन प्रणाली आधारलेली असताना अनेक ठिकाणची राज्य सरकारे मंदिरांतील धनाचा वापर सरकारी योजनांसाठी हवा तसा करत आहेत. देशावरील कर्जाबाबत जेव्हा जेव्हा चर्चा होते तेव्हा देशातील माजलेल्या भ्रष्टाचाराबाबत साधे ब्र न काढता मंदिरांची संपत्ती ताब्यात घेण्याची भाषा काही महाभागंकडून केली जाते. आज देशभरातील लाखो मंदिरे सरकारच्या ताब्यात आहेत, मात्र अन्य धर्मियांची किती प्रार्थनास्थळे आणि शैक्षणिक संस्था सरकारने अधिग्रहित केल्या आहेत ? त्यांनाही वर्षभरात कोट्यवधींच्या देणग्या मिळत असतात मग त्यांच्यावर सरकारचे लक्ष का नाही? देशाने पंथ निरपेक्ष शासनप्रणालीचा स्वीकार केला असताना समाजातील केवळ बहुसंख्य वर्गावर अन्याय का?

■ लीना गाडगीळ, पनवेल.

# तंबाखूमुळे वाढतोय मुख कर्करोगाच्या विळखा

भारतामध्ये कोरडी पाने, सिगारेट, विडी, चिलम, गुटखा आदी अशा विविध रुपात तंबाखू सेवन केले जाते. देशात दरवर्षी रस्ता किंवा अपघातात ५० हजार लोक मृत्युमुखी पडतात मात्र तंबाखूमुळे साधारणतः १० लाख लोक मरण पावतात, दर ५ व्यक्तीमधील १ व्यक्तीच्या मरणाचे कारण तंबाखू आहे.

तंबाखू सेवनामुळे अनेक प्रकारचे रोग जडतात आणि त्याचा मानवी आरोग्यावर विपरीत परिणाम दिसून येतात. यामध्ये अथरोस्कोलोरोसिस, हार्ट अटॅक, पेरिफेरल वॅस्कुलर डिसिज, ब्रेन स्ट्रोक, ॲम्पायसिमा लंग कॅन्सर, फिटल डॅमेज, लॅरिंजियल कॅन्सर, डेंटल प्रॉब्लम, ल्यूकोप्लाकिया, ओरल सबम्युकोसल फायब्रोसिस, ओरल कॅन्सर तसेच प्रति दिवशी २० सिगारेट ओढणारा व्यक्ती आपले आयुष्य १० वर्षांनी कमी करून घेतो.

गुटखा खाणाऱ्या व्यक्तीमध्ये तोंड उघडणे लवकर बंद होणे, वारंवार तोंड येणे, तोंडात लाल व पांढरे चट्टे दिसणे, जेवण करताना तिखट लागणे, तोंड कमी उघडणे, तोंडातील एखादी जखम एक महिन्यापेक्षा जास्त न बसणे, तोंडात एखादी अनावश्यक गाठ आढळणे, जिभेला असणारी एखादी गाठ होणे, आवाजात झालेला बदल, लाळग्रंथीच्या जागेवर असलेली सूज येणे, आदी लक्षणे हळूहळू दिसून येतात. यासाठी तज्ज्ञाकडून तपासणी करून घेणे अत्यावश्यक ठरते.

तंबाखूमुक्त भारत ही संकल्पना तंबाखू प्रतिबंधात्मक केंद्राच्या माध्यमातून राबवित असून, भारतातील हे पहिले केंद्र आहे. तंबाखू दिनानिमित्त तंबाखू त्यागाचा संकल्प करावा.

**तंबाखूमधील विषारी द्रव व त्याचे शरीरावर होणारे परिणाम**

निकोटिन : कॅन्सर, रक्तचाप.
कार्बन मोनोक्साईड : हृदयरोग, अंधत्व, दमा.
मार्श गॅस : शक्तिहीनता, नपुंसकता.
अमोनिया : मंद पाचनशक्ती, पित्ताशय विकृती.
कोलोडॉन : स्नायूंमध्ये विकृती, डोके दुखणे.
पापरीडीन : अजीर्ण, डोळ्यांची जळजळ.
कार्बोलिक ॲसिड : अनिद्रा, विस्मरण.
परफेरॉलः अशक्तपणा.
अँजेलिन सायनोझोन : रक्तविकार.
फॉस्फोरल प्रोटिक ॲसिड : उदासीनता, टीबी

अशा आजारांची लागण होऊन त्याचे शरीरावर विपरीत परिणाम होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

योग करून आपल्या मनाचा कठोर निश्चय करा व संकल्प शक्ती वाढवून या नशेचा परित्याग करा. उपचार म्हणून शस्त्रक्रिया, किमोथेरपी, रेडिओथेरपी, तंबाखू व तंबाखूजन्य पदार्थांचे सेवन केल्यास कर्करोग होतो पण वेळेस उपचार केल्यास बरा होऊ शकतो. सध्या तंबाखू व पान खाऊन थुंकल्यास कोरोना पण वाढू शकतो.

डॉ. योगेश साहू
सदस्य,राष्ट्रीय तंबाखू निर्मूलन समिती
अध्यक्ष, इंडियन डेंटल असोसिएशन
संस्थापक : डॉ. साहू तंबाखू प्रतिबंधात्मक केंद्र,
अध्यक्ष, लोकसेवा संघ, अकोला.



# झटपट वजन कमी करण्यासाठी फॉलो करा या तज्ञांच्या सोप्या ट्रिक्स

बदलत्या जीवनशैलीमुळे ताणतणाव वाढत असून, जीवनशैलीशी संबंधित समस्याही वाढत आहेत. लठ्ठपणा हे याचे मुख्य कारण आहे, जे हृदय आणि मेंदूच्या आजारांना देखील आमंत्रण देते. ते कमी करण्यासाठी लोक खूप मेहनत करतात, पण त्यांना यश येत नाही.

जास्त प्रमाणात जंक फूडचे सेवन केल्यामुळे गंभीर परिणाम होऊ शकतात. आरोग्याची योग्य पद्धतीनं काळजी घेण्यासाठी आहाराकडे विशेष पद्धतीनं लक्ष देण्याची गरज असते. आहारामध्ये पोषक तत्वं नाही खाल्ल्यामुळे गंभीर आजार होण्याची शक्यता असते.

वाढलेल्या वजनामुळे मधुमेह आणि उच्च रक्तदाब यांच्या सारख्या समस्या उद्भवू शकतात. वजन कमी करण्यासाठी अनेक प्रयत्न केले जातात. वजन कमी करण्यासाठी तज्ञांकडून अनेक मार्ग सुचवले आहेत जे ३० दिवसांत वजन कमी करण्यास मदत करेल.

हळद-काळी मिरी गोळी :

हळद-काळी मिरीची गोळी तयार करण्यासाठी अर्धा चमचा हळद आणि एक चतुर्थांश चमचा काळी मिरी पावडर घ्या. तयार मिश्रण १० मिनिटे पाण्यात चांगले उकळवा. तयार मिश्रण पुन्हा गाळून घ्या आणि कोमट होईपर्यंत सोडा. आता त्यात लिंबाचा रस मिसळा आणि ते प्या.

तज्ञांनी सांगितलेले उपाय केल्यास शरीरातील सर्व वेदना आणि कडकपणा नाहीसा होईल. पोट फुगणे आणि आम्लपित्त या समस्यांपासून आराम मिळेल . चयापचय जलद होईल आणि वजन वेगाने कमी होईल. याशिवाय यकृत देखील स्वच्छ होईल आणि कोलेस्टेरॉलची पातळी देखील नियंत्रित राहील.

एक सुपर ड्रिंक सर्वकाही करू शकत नाही. जसे की निरोगी संतुलित आहार, नियमित शारीरिक हालचाली, चांगली झोप आणि योग्य प्रमाणात पाणी पिणे. रमिता कौर यांनी कमेंट बॉक्समध्ये याबद्दल माहिती दिली आहे. तुम्ही ते सकाळी रिकाम्या पोटी किंवा झोपण्यापूर्वी ३० मिनिटे घेऊ शकता. यामुळे फायदा नक्की होईल.

## अशोकायन



प्रा. अशोक सारडा
मेहकर
(९४२१३९४३३९)

### त - तंबाखूचा...!

गाढव सुद्धा
खात नाही तंबाखू
आम्ही मात्र
खातो फुकू फुकू..

आमची चॉईस
हाय लई भारी
कॅन्सर येतो भौ
आपसुक दारी..!!

कुटुंबावर असेल प्रेम तर
तंबाखुला द्या तिलांजली
अन्यथा दुर्दैवाने द्यावी लागेल
तारूण्यातच श्रद्धांजली!!

# अमरावतीत गुटखा साठ्यावर आणखी एक मोठी कारवाई





## 10.43 लाखांचा प्रतिबंधित माल जप्त

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती ( दि. 30 )**- अमरावती शहरात प्रतिबंधित गुटख्याच्या साठ्यावर पोलिसांनी पुन्हा एकदा मोठी कारवाई करत 10.43 लाख रुपये किमतीचा माल जप्त केला आहे. ही कारवाई गुन्हे शाखा युनिट क्रमांक 1 च्या पथकाने गाडगेनगर पोलीस ठाण्याच्या हद्दीत येणाऱ्या रामपुरी कॅम्प परिसरात केली. या छाप्यात राजेश भगवानदास केसवाणी (50) या आरोपीला अटक करण्यात आली आहे.

पोलिसांना गुप्त बातमीदारामार्फत माहिती मिळाल्यानंतर, त्यांनी अन्न सुरक्षा अधिकारी गजानन गोरे यांच्यासह संबंधित ठिकाणी छापा टाकला. घराच्या दोन खोल्यांमध्ये गुटख्याचा मोठा साठा आढळून आला. बाजीराव गोल्ड, पान पराग, नजर, विमल, नागपूरी प्रीमियम, पान बहार, मस्तानी, एच-5, जोल्ट तंबाखू यांसारख्या विविध कंपन्यांच्या ब्रँडचा प्रतिबंधित गुटखा साठवून ठेवण्यात आला होता. पोलिसांनी एकूण 10 लाख 43 हजार 860 रुपये किमतीचा गुटखा जप्त केला आहे. यासंदर्भात अन्न सुरक्षा अधिकारी गजानन गोरे यांनी दिलेल्या तक्रारीवरून गाडगेनगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू आहे. आरोपीविरोधात अन्न सुरक्षा कायदा आणि महाराष्ट्र सरकारच्या प्रतिबंधित पदार्थ नियमांनुसार गुन्हा नोंदवण्यात येणार आहे.ही कारवाई पोलीस आयुक्त अरविंद चावरिया, पोलीस उपायुक्त कल्पना बारवकर, परिमंडळ एकचे उपायुक्त सागर पाटील आणि सहायक पोलिस आयुक्त अरुण पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली. कारवाईत पो.नि. गोरखनाथ जाधव, सपोनि मनीष वाकोडे, पोउपनि प्रकाश झोपाटे यांच्यासह पोलिस अंमलदारांची संपूर्ण टीम सहभागी होती.

# अंजनगाव सुर्जी येथून 'कृषी संकल्प अभियान' ला उत्साहात सुरुवात

## शास्त्रज्ञांचे मार्गदर्शन, शेतकऱ्यांचा उत्स्फूर्त सहभाग



**महासागर प्रतिनिधी**

**अंजनगाव सुर्जी,( दि.30 )** - केंद्र सरकारच्या 'कृषी संकल्प अभियान' या उपक्रमाचा प्रारंभ 29 मे रोजी अंजनगाव सुर्जी येथून झाला. आधुनिक तंत्रज्ञान व शास्त्रोक्त शेतीप्रती शेतकऱ्यांमध्ये जागृती निर्माण करण्यासाठी हा उपक्रम राबवण्यात येत असून, याअंतर्गत शेतकरी मेळाव्याचे आयोजन करण्यात आले.


आमदार गजानन लवटे यांच्या हस्ते उद्घाटन झालेल्या या मेळाव्याची 'विकसित कृषी संकल्प अभियान' ही संकल्पना होती. अध्यक्षस्थानी बाळासाहेब वानखडे होते. त्यांनी आपल्या भाषणात कृषी क्षेत्राला अर्थव्यवस्थेचा कणा आणि शेतकऱ्याला आत्मा म्हणत शेतीच्या विकासावर भर दिला.मेळाव्यात शास्त्रज्ञ के. पी. सिंग, डॉ. रविंद्र नैताम, डॉ. महेंद्र रघुवंशी, डॉ. हेमंत डीके, डॉ. हर्षद ठाकूर आदींनी शेतकऱ्यांना आधुनिक शेतीतंत्र, बियाण्यांचे फायदे, माती परीक्षण, पाणी व्यवस्थापन व हवामानाशी सुसंगत शेती यावर मार्गदर्शन केले.29 मे ते 12 जून या कालावधीत कृषी विज्ञान केंद्रे व संशोधन संस्थांचे शास्त्रज्ञ जिल्ह्यातील विविध भागांतील शेतकऱ्यांना प्रत्यक्ष भेटून सल्ला देणार आहेत. कार्यक्रमास उपसभापती सुरेश राऊत, माजी उपाध्यक्ष विठ्ठलराव चव्हाण, तालुका कृषी अधिकारी भारती जाधव, हरीभाऊ बहिरे, बाळासाहेब पोटे, गजानन धोटे, शशिकांत मंगळे, अशोक चरपे, बाळासाहेब चर्हाटे, विजय कळमकर, अविनाश सदार, सुरेश आडे, अनंत रोकडे, शंकरराव चोरे, विशाल पंडित, प्रदीप इंगळे, संजय काळमेघ, शारदा ढोक, पुनम पोटे, निता बोचरे, अमर शिंगणे, सागर घोगरे, चंद्रशेखर शेळके, अविनाश सदार, शे. जमील शे. रहमान, श्रीराम नेहर, शिवाजी हरणे, गजानन दुधाट, विलास कविटकर, माणिकराव मानकर, निलेश घोडेराव, सुधीर गोळे उपस्थित होते. मेळाव्यास कृषी विभागाचे अधिकारी, शेतकरी यांची उपस्थिती लाभली. कार्यक्रमाचे संचालन प्रा. सुबोध काळमेघ तर आभार प्रदर्शन संचालक विकास येवले यांनी केले.

# वादळी पावसामुळे झाडे कोसळली

- विद्युत वाहिन्यांचे तारा तुटल्या
- तिवसा शहराचा वीजपुरवठा खंडित

**महासागर प्रतिनिधी**

**तिवसा,( दि.30 )** - तिवसा शहरात 29 मे रोजी दुपारी सुमारे 4 वाजता अचानक आलेल्या वादळी व मुसळधार पावसाने थैमान घातले. गडगडाटी वादळ, विजांचा कडकडाट आणि जोरदार वाऱ्यांमुळे काही क्षणांतच शहरात घबराट पसरली. वादळी वाऱ्यामुळे तिवसा बसस्थानकासमोरील परिसरात मोठ्या प्रमाणावर झाडे कोसळली. विशेषत: प्रभाग क्रमांक 8 मधील कडुनिंबाचे झाड थेट महावितरणच्या विद्युत वाहिनीवर कोसळल्यामुळे विद्युत तारा तुटून पडल्या. परिणामी, संपूर्ण तिवसा शहराचा वीजपुरवठा खंडित झाला आणि शहर अंधारात बुडाले. या घटनेमुळे विद्युत वाहिन्यांचे मोठे नुकसान झाले असून महावितरणचे कर्मचारी तात्काळ घटनास्थळी दाखल झाले आहेत. तुटलेल्या तारांमुळे निर्माण झालेला संभाव्य धोका लक्षात



घेता युद्धपातळीवर वीजपुरवठा पूर्ववत करण्याचे कार्य सुरू आहे. नागरिकांनी संयम बाळगण्याचे आवाहन प्रशासनाकडून करण्यात आले आहे. वीजपुरवठा खंडित झाल्यामुळे पाणीपुरवठा, छोटे व्यवसाय, दुकाने आणि घरगुती सुविधा पूर्णत: ठप्प झाल्या आहेत. तसेच शहरातील विविध धार्मिक आणि सांस्कृतिक कार्यक्रमांवरही या वादळाचा परिणाम झाला. अनेक ठिकाणी मंडप उडाले असून साहित्याचेही मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले. त्यामुळे नागरिकांमध्ये काही काळासाठी भीतीचे आणि गोंधळाचे वातावरण निर्माण झाले.

# संतोष शेंडे यांना राजीव गांधी कृषीरत्न पुरस्कार

## उत्कृष्ट कृषी पत्रकारितेकरिता गौरव

**महासागर प्रतिनिधी**

**टाकरखेडा संभू, ( दि.30 )**- राजीव गांधी कृषी विज्ञान प्रतिष्ठान, अमरावती यांच्या वतीने दिला जाणारा राज्यस्तरीय राजीव गांधी कृषीरत्न पुरस्कार 2025 यंदा 'उत्कृष्ट कृषी पत्रकारिता (प्रिंट मीडिया)' या संवर्गात टाकरखेडा संभू येथील पत्रकार संतोष शेंडे यांना प्रदान करण्यात आला. त्यांच्या पत्रकारितेतील अभ्यासपूर्ण आणि प्रयोगशील योगदानाबद्दल त्यांना हा पुरस्कार जाहीर करण्यात आला



असून, विशेष प्रमाणपत्र देऊन त्यांचा सपत्नीक गौरव करण्यात आला.

संतोष शेंडे यांनी शेतकर्यांच्या समस्यांना नेमकेपणाने उजाळा देताना कृषी क्षेत्रातील तांत्रिक, सामाजिक आणि आर्थिक घडामोडींचे वस्तुनिष्ठ चित्रण केले आहे. अपार कष्ट, सततच्या अडचणी, खालावलेली आर्थिक स्थिती, आणि नैराश्याच्या गर्तेत अडकलेल्या शेतकर्यांसाठी त्यांनी मांडलेल्या बातम्या आणि विश्लेषणे दिशादर्शक ठरली आहेत. शेतकर्यांच्या आत्मविश्वासाला बळ देणारे आणि समाजप्रबोधनात्मक दृष्टिकोन असलेले पत्रकारितेचे कार्य इतरांसाठीही प्रेरणादायी ठरणार आहे. याकरीता सदरचा पुरस्कार संतोष शेंडे यांना प्रदान करण्यात आला. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक पोर्णिमा सवाई यांनी तर सूत्रसंचालन गोपाल कडू यांनी केले. आभार तालुका कृषी अधिकारी उत्कर्षा भोसले यांनी मानले. कार्यक्रमाला सरपंच रश्मी देशमुख, उपसरपंच प्रदीप शेंडे, कृषी पर्यवेक्षक अमोल सराड, वैभव जाधव, भिवसन बकाल, गणेश बकाल, दिलीप काळे, भैय्यासाहेब निचळ, राहुल तायडे, विवेक मोहोड, सौरभ मानकर, अतुल भुस्कडे, वृजेश सवाई, प्रशांत ठाकरे, बल्लू पाटील, अनुउल्ला खान आदी प्रामुख्याने उपस्थित होते.

# मातोश्री रमाबाई आंबेडकर स्मृती दिन

## नालंदा बुद्ध विहारात आयोजन

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती,( दि.30 )**- मातोश्री रमाई स्मृती दिनानिमित्त नालंदा बुद्ध विहारात एका कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी रमाबाई आंबेडकर यांना अभिवादन करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी अध्ययन मंचाचे अध्यक्ष एकनाथ वासनिक होते. तर यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून कविवर्य पद्माकर मंडवधरे उपस्थित होते.याप्रसंगी मातोश्री रमाई यांच्या प्रतिमेचे पूजन करून बुद्धवंदना घेऊन विनम्र आदरांजली अर्पण करण्यात आली. कोमल मेश्राम यांनी रमाई यांच्या जीवनावर आधारित गीत तर पद्माकर मंडवधरे यांनी कविता सादर केली. अध्यक्षीय भाषणात एकनाथ वासनिक यांनी रमाईच्या जीवनावर प्रकाश टाकला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सुरज मंडे तर आभार प्रदर्शन रवीकुमार मेश्राम यांनी केले. कार्यक्रमाला डॉ. बाबसाहेब आंबेडकर अध्ययन मंचेचे आजी-माजी पदाधिकारी व सभासद, रमाई महीला मंडळ पदाधिकारी व सभासद आणि परिसरातील बहुसंख्य समाज बांधव उपस्थित होते.

# नवे जिल्हाधिकारी आशिष येरेकर रूजू

**अमरावती** - अमरावती जिल्हाधिकारी पदी आशिष येरेकर आज रूजू झाले आहे. त्यांनी रितसर जिल्हाधिकारी पदांची सूत्रे स्विकारली. यावेळी निवासी उपजिल्हाधिकारी अनिल भटकर यांनी पुष्पगुच्छ देऊन श्री. येरेकर यांचे स्वागत केले. यावेळी अतिरिक्त जिल्हाधिकारी गोविंद दानेज, उपजिल्हाधिकारी ज्ञानेश्वर घ्यार, तहसिलदार विजय लोखंडे, अधिक्षक निलेश खटके आदी उपस्थित होते. रूजू झाल्यानंतर येरेकर यांनी विभागीय आयुक्त श्वेता सिंघल यांची



विभागीय आयुक्त कार्यालयात भेट घेतली.

# आमदार श्रीकांत भारतीय यांना मातृशोक

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती, ( दि. 30 )** - आमदार श्रीकांत भारतीय व तुषार भारतीय यांच्या मातोश्री सौ ताराबाई पंडितराव भारतीय यांचे आज शुक्रवारी, दि.30 मे रोजी सायंकाळी वृध्दापकाळाने निधन झाले. त्या 85 वर्षांच्या होत्या. त्यांच्या मागे मुलगा, सून,



नातवंड आणि बराच मोठा आप्तपरिवार आहे. त्यांच्यावर उद्या दि 31 मे 2025 रोजी सकाळी 10:30 व वाजता हिंदू स्मशानभूमी, अमरावती येथे अंत्यसंस्कार करण्यात येतील. तत्पूर्वी त्यांची अंत्ययात्रा त्यांचे निवासस्थान श्री. सहनिवास अपार्टमेंट , कृष्णार्पण , अमरावती येथून निघेल.

**प्लाट विकणे आहे**

**प्लाट फक्त 6 लाख**
**51 हजार रुपये मध्ये**
**अमरावती पासून जवळच**
**तेही फक्त 25 ते 30 मिनिटांच्या अंतरावर**

संपर्क
**7972805778**
**7620765180**

**जुनी, निरुपयोगी व निर्लेखित यंत्रसामुग्री विक्रीकरिता**

**निविदा**

शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था, अचलपूर जि. अमरावती 444806 या संस्थेतील जुनी निरुपयोगी व निर्लेखित यंत्रसामुग्रीचा जसे आहे जेथे आहे या तत्वावर विक्री करावयाची आहे. सदर साहित्याची खरेदी करिता उपलब्ध साहित्या, वस्तू, नग इत्यादीचा सविस्तर तपशिल तसेच अटी व शर्ती संस्थेचा सूचना फलकावर प्रसिद्ध करण्यात आल्या आहेत तसेच विक्री करिता 06/06/25 रोजी दुपारी 4.00 वाजे पर्यंत निविदा सादर कराव्या.

सदर निविदा उघडणे दि. 06/06/2025 सायं. 5 वाजता उघडण्यात येतील. संबंधित आस्थापना प्रमुखांनी दिलेल्या वेळी ओळखपत्रासह हजर रहावे.

**प्राचार्य**
शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था,
अचलपूर जि. अमरावती

**टीप** - निविदेचा तपशील व साहित्याची यादी संस्थेतून घेवून प्रपत्रनिहाय निविदा सादर कराव्या.

# किरिट सोमय्या यांची अमरावती महापालिकेला भेट

## 2190 बोगस जन्ममृत्यू प्रमाणपत्रांवर कारवाईची मागणी

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती,( दि. 30 )**- भाजपचे ज्येष्ठ नेते किरिट सोमय्या यांनी शुक्रवारी अमरावती महापालिकेला भेट देऊन जन्म-मृत्यू प्रमाणपत्र घोटाळ्याची गंभीर दखल घेतली. या भेटीत त्यांनी संबंधित अधिकाऱ्यांकडून माहिती घेत 2190 बोगस प्रमाणपत्रांची प्रकरणे उघडकीस आली असल्याचे सांगितले. हे सर्व प्रमाणपत्रे अमरावती तहसील कार्यालयातून चुकीच्या पद्धतीने जारी करण्यात आली होती.

सोमय्या यांनी सांगितले की, 2190 पैकी 1700 नागरिकांनी ही प्रमाणपत्रे महापालिकेत येवून



मिळवली, तर उर्वरित 490 प्रमाणपत्रे कोणीही न घेतल्याचे निदर्शनास आले. या संदर्भात सोमय्या यांनी विचारले की, 'ही 490 प्रमाणपत्रे घेणारे लोक कोण? त्यांचा पत्ता लागणे आणि त्याची सखोल चौकशी होणे अत्यावश्यक आहे.' त्यांनी पोलिस आयुक्तांनी याची सखोल तपासणी करावी, अशी ठाम मागणी केली.

तसेच, सोमय्या यांनी महापालिकेकडून या सर्व 2190 प्रमाणपत्रांची रद्द केली असल्याची माहिती दिली. मात्र, त्यांनी आश्चर्य व्यक्त करत विचारले की, 'मी अमरावतीला येण्यापूर्वीच 1654 प्रमाणपत्रे कशी रद्द करण्यात आली? या रद्द करण्यामागील प्रक्रिया पारदर्शक आहे का, याचीही तपासणी व्हावी.' या प्रकरणामुळे अमरावती महापालिकेतील प्रशासनिक पारदर्शकतेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. नागरिकांमध्येही या प्रकारामुळे संभ्रम आणि चिंता व्यक्त केली जात आहे. भविष्यात अशा प्रकारचे गैरप्रकार टाळण्यासाठी ठोस कार्यवाही आणि जबाबदाऱ्यांची निश्चिती होणे गरजेचे असल्याचे मत सोमय्या यांनी यावेळी व्यक्त केले.

**संचालक**

**उपवने व उद्याने, महाराष्ट्र राज्य, मुंबई. यांचे कार्यालय, बांधकाम भवन, दुसरा मजला, 25. मर्झबान रोड, फोर्ट, मुंबई 400001.**
**Email-dirmum.pg@mahapwd.gov.in. Ph. 022-22016852**

**निविदा सुचना क्र. 07 सन 2025-26**

संचालक, उपवने व उद्याने, महाराष्ट्र राज्य, मुंबई, 2 रा मजला, बांधकाम भवन, 25 मर्झबन रोड, फोर्ट, मुंबई-400 001, दुरध्वनी क्र. 022-22016852 हे अमरावती येथील सर्किट हाऊस आवारातील उद्यान देखभाल (रूपये दश लक्ष आत एकूण-1 कामाकरीता) अनुभवी कंत्राटदार / ठेकेदार यांचेकडून ब-1 नमुन्यातील निविदा मागवित आहेत.

कोऱ्या निविदेचा नमुना दि. 02/06/2025 ते दि. 09/06/2025 रोजी सायं. 17.00 पर्यंत सहाय्यक संचालक, उपवने व उद्याने, नागपूर या कार्यालयातुन देण्यात येईल. भरुन पाठविलेल्या सिलबंद निवीदा दि. 11/06/2025 रोजी सायं. 14.00 वाजेपर्यंत संचालक, उपवने व उद्याने, महाराष्ट्र राज्य, मुंबई या कार्यालयात स्विकारण्यात येतील आणि शक्यतो त्याच दिवशी उघडण्यात येतील.

सविस्तर निवीदा सुचना सहाय्यक संचालक, उपवने व उद्याने, नागपूर कार्यालयामध्ये सुचना फलकावर पहावयास मिळेल. कोणतेही कारण न देता एक किंवा सर्व निवीदा रद्द ठरविण्याचा अधिकार राखून ठेवला आहे.

**जा क्र. संउवड/लेशा/बी-1/नि.प्र./842/25-26**
**संचालक, उपवने व उद्याने,**
**महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे कार्यालय,**
**25 मर्झबान रोड, फोर्ट, मुंबई 400 001**
**दूरध्वनी क्रमांक 022-22016852.**
**Email:dirmum.pg@mahapwd.gov.in**
**दिनांक:- 21/05/2025**

**(वि. गो. रावळ)**
**संचालक**
**उपवने व उद्याने,**
**महाराष्ट्र राज्य, मुंबई**

**विमाका./अम./जाहि./782/2025-2026**

# चिखलदऱ्यातील देवी पॉइंट परिसराला अतिक्रमणाचे ग्रहण

**हजारो चौ.फू. जमीनीवर अवैध ताबा | पक्की बांधकामे, पालिकेचे दुर्लक्ष | भाविक आणि स्थानिकांना मनस्ताप**

**महासागर प्रतिनिधी**

**चुरणी, ( दि.30 )**- चिखलदरा येथील प्रसिद्ध श्री देवी मंदिर परिसरात गेल्या काही वर्षांत मोठ्या प्रमाणात अतिक्रमण वाढले असून नगर परिषदेच्या दुर्लक्षामुळे त्यात दिवसेंदिवस सतत भरच पडत आहे. येथे काही झोळेवाल्यांनी सुरुवातीला तात्पुरत्या स्वरूपात व्यवसाय सुरू केला होता. आता त्यांनी पक्के बांधकाम करुन हजारो चौरस फूट जागा बळकावण्याची तयारी केली आहे. पालिकेतील अधिकारी या गैरप्रकाराकडे डोळेझाक करित असून त्यांच्या अशिर्वादानेच हे अतिक्रमन झाले असल्याचा आरोप केला जात आहे.



यासंदर्भात प्राप्त माहितीनुसार देवी पॉईंट जवळील मोकळ्या जागेचा काही भाग झोळेवाल्यांना एक वर्षासाठी लिजवर देण्यात आला होता. हा करार तत्कालीन वादग्रस्त मुख्याधिकारी व प्रशासक सुधाकर पानझाडे यांच्या कार्यकाळात झाला होता. करारनाम्यामध्ये जागेचे मोजमाप नमूद नसल्यामुळे लिज धारकांनी मनमानी करत हजारो चौरस फूट जागेवर बेकायदेशीररित्या कब्जा केला आहे. विशेष म्हणजे लिजची मुदत संपून सात महिने झाले असताना देखील, संबंधित व्यापारी कोणतेही भाडे अदा न करता व्यवसाय सुरू ठेवून प्रशासनाची फसवणूक करत आहे. येथे दुकानदारीच्या आडोश्याने गैरकायदेशिर कारभारही केला जात असल्याची चर्चा आहे. या सर्व गैरप्रकारामुळे देवी मंदिरात येणारे भाविक आणि स्थानिकांना विनाकारण मनस्ताप सहन करावा लागत आहे.

> लिज संपल्याची माहिती नव्हती. काही दिवसांपूर्वी त्याच लिजधारकाकडून अधिक जागा लिजवर मागण्यासाठी अर्ज प्राप्त झाला आहे. ज्यावर अद्याप निर्णय घेतला गेलेला नाही. मात्र परवानगीशिवाय अतिक्रमण केल्यास संबंधितावर योग्य ती कारवाई केली जाईल
>
> **सुधीर धावडे, प्रभारी मुख्याधिकारी**

> पालिकेनेच नियमांचा फज्जा उडवून संबंधित झोळेवाल्याला ही जागा दिल्यामुळे या जागेवर छोटे व्यवसाय करणार्या स्थानिकांना अडचणींचा समना करावा लागत आहे. त्यांच्यावर उपासमारीची वेळ आली आहे. नियमांनुसार सर्व स्थानिकांना या जागेवर व्यवसाय करण्याची संधी मिळावी आणि सर्वांना समान हक्क मिळावा. जर लवकरात लवकर या प्रकरणाचा निकाल लागला नाही, तर आम्ही संघटित स्वरूपात पालिकेसमोर आत्मदहन करू.
>
> **प्रवीण धुर्वे, मेलघाट योद्धा संघटना**

# लोककल्याणकारी प्रशासनाचा दीपस्तंभ
# अहिल्यादेवी होळकर

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांची येत्या ३१ मे २०२५ ला ३०० वी जयंती आहे. अत्यंत साधे जीवन आणि पराकोटीचे दातृत्व ही ओळख असलेल्या या लोकराज्ञीच्या त्रीशताब्धी जन्मोत्सवाच्या निमित्ताने...

------------------

अनेक रूढी-परंपरांचा पगडा असलेल्या मध्ययुगात जगाच्या आणि भारताच्या इतिहासात आपल्या कार्यकर्तृत्वाने अढळ स्थान निर्माण करणाऱ्या स्त्रिया अगदी थोड्याच आहेत. अशा मोजक्या कर्तृत्ववान स्त्रीयांमध्ये शुभ्र चरित्र, चारित्र्य आणि लोककल्याणाच्या ध्यासाने चमकुन गेलेल्यापैकी अहिल्यादेवी होळकर यांचा इतिहास आपल्या वेगळेपणामुळे नजरेत भरतो.

राज्यकारभार हाती घेताक्षणीच माझे प्रत्येक कार्य प्रजेला सुखी करणे आहे. माझ्या प्रत्येक कृतीला मी स्वतः जबाबदार आहे ... अशी प्रतिज्ञा घेऊन अत्यंत प्रतिकुल परिस्थिती असतांना सुद्धा तब्बल २८ वर्षे कल्याणकारी राज्य करणाऱ्या राजयोगीनी अहिल्याबाईचा जन्म ज्येष्ठ वद्य सप्तमी शके १६४७ दि ३१ मे १७२५ रोजी महाराष्ट्रात झाला. महाराष्ट्रातील चौंडी येथील सुशीलाबाई व माणकोजी शिंदे हे त्यांचे आई-वडील.

विंध्य पर्वतापासून चित्तोड आणि मोकुद्रा डोंगरांच्या रांगांपर्यंत दक्षिण-उत्तर, आणि पूर्वेच्या भोपाळपासून पश्चिमेच्या गुजरात जवळील दोहदपर्यंत पसरलेले पठार म्हणजे माळव्याचा प्रदेश. मराठ्यांची भगवी पताका अटकेपार रोवण्यासाठी थोरल्या बाजीरावांनी अठरापगड जातींची कर्तबगार माणसे भोवती जमवून, त्यांच्या कर्तृत्वाला वाव दिला.

यात माळवा या प्रदेशाची जबाबदारी मराठा सुभेदार मल्हारराव होळकर यांचेवर होती. ते एका राजनैतिक कामासाठी पुण्यास निघाले असता सीणा आणि हरणा नद्यांच्या संगमावरील चौंडी येथे त्यांचा मुक्काम पडला. दिवेलागणीच्या वेळी मंदीरात चुणचुणीत आनि बेडर बालअहिल्या मल्हाररावांच्या नजरेस पडली. मुलगा खंडेरावासाठी हेच योग्य स्थळ, असे मनोमन ठरवून यथावकास रीतिभातीप्रमाणे खंडेराव - अहिल्येचा विवाह संपन्न झाला. ते वर्ष होते १७३३ आणि बालअहिल्येचे वय होते वयवर्ष आठ.

पुढे नववधू बालअहिल्येचा गंभीर चेहरा, एकाग्र श्रवण आणि सावध नजर गुणग्राहक मल्हाररावांनी हेरली. सुनेचा करारीपणा आणि गुणवत्ता पाहून सासरे शिक्षणासोबतच तिच्यावर घरगुती आणि शासन-प्रशासनातील जबाबदाऱ्या सोपवू लागले. मुलकी देवघेव, मसलती, कारखाने व्यवस्थापन, लढाया, शस्त्रनिर्मिती, रसदपुरवठा, युध्दशाळा यातील गती बघून कालांतराने होळकरांच्या खजिन्याच्या किल्ल्या अहिल्याबाईच्या हाती आल्या व ती पराक्रमी मल्हाररांवाचा उजवा हात बनली.

सुरजमल जाटांविरोधातील मोहिमेत कुंभेरी किल्ल्याला होळकरांचा वेढा पडला असता १७ मार्च १७५४ रोजी तोफगोळा पडून अहिल्यापती खंडेरावाला वीरमरण आले. तत्कालीन रुढीप्रमाणे सती जायला निघालेल्या अहिल्येला तिच्या सासऱ्यांनी त्यापासून परावृत्त केले. मुलुखगीरी करणाऱ्या नवऱ्याच्या मृत्युपश्चात शोक आवरून मराठेशाहीत डंका असलेल्या सास-याच्या राजकारणात अहिल्या सहकार्य करू लागली. मल्हारराव मराठेशाही विस्ताराच्या सतत मोहिमांवर असत तेव्हा अहिल्याबाई इंदूर येथून सगळा मुलकी राज्यकारभार चोखपणे सांभाळत होत्या. बुंदेलखंडात अंमल बसवून गोहदच्या जाटांवर चढाई सुरु असताना २० मे १७६६ या दिवशी आलमपूर येथे मल्हाररावांचे दुःखद निधन झाले. अहिल्याबाईंचे छत्र हरपले. होळकरशाही व मराठेशाहीचा मजबूत खाब निखळला.



नंदू लुचे
नागपूर.
९८२३२९९९२९

माळव्याचा वारस म्हणून अहिल्यापुत्र मालेराव यांना सुभेदारीची सनद प्राप्त झाली. मात्र ज्येष्ठ, श्रेष्ठ, जाणकार म्हणून राज्यकारभाराचा भार ओघाने बाईच्यांच खांद्यावर आला. कर्त्या पुरुषांचे सतत मृत्यु बघावे लागलेल्या अहिल्याबाईवर पुन्हा एक आघात झाला. वर्षभरातच दि. २७ मार्च १७६७या दिवशी त्यांचा एकुलता एक मुलगा मालेराव यांचा बाविसाव्या वर्षी मृत्यू झाला.

यावेळी इंदूर संस्थानात गंगाधर यशवंत चंद्रचूड हे होळकरांचे जुनेजाणते दिवाण होते. मल्हाररावांच्या राज्यात पेशव्यांनीच त्यांची नियुक्ती केली होती. होळकरांच्या सैन्याचा सेनापती तुकोजी होळकर दूर उदयपुरच्या आसपास असतांनाची संधी साधून दिवाण गंगोबातात्या यांनी पेशवा राघोबादादाशी संधान बांधले.

यावेळी पुण्यातून बेदखल केलेले राघोबादादा स्वतःवरील कर्ज निवारण्यासाठी मुलखगिरी करत माळव्याच्या आसपासच होते. गंगोबातात्यानी त्यांना, 'होळकरांची दौलत बेवारस झाली असून सत्वर येऊन येथील दौलतीचा कारभार समेटावा ' असा आग्रह धरला. कर्तुत्ववान सासरे, पती व एकुलता एक मुलगाही कैलासवाशी झाल्याने आपल्या सोईचा एक दत्तक देऊन त्याच्या नावे दिवाण म्हणून स्वतः राज्यकारभार करायचे आणि राघोबादादास बक्कळ नजराणा देऊन हे संपन्न राज्य घशात घालायचे, असे त्यांचे मनसुबे होते.

पण अहिल्याबाई या जरी देवधर्म आणि कर्तृत्वाने देवत्वाला पोचलेल्या पुण्यश्लोक असल्या तरी त्या निव्वळ देवभोळ्या नव्हत्या. पराक्रम, धडाडी आणि हिकमतीच्या बळावर मराठा साम्राज्याचे महत्त्वाचे खांब असलेल्या कर्तव्यकठोर मल्हाररावांच्या तालमीत तयार झालेल्या अष्टावधानी लोकराज्ञी होत्या.

त्यांना गंगोबा आणि राघोदादांचा बेत समजला. इंदूर-महेश्वरावर स्वारी करण्याच्या बेतात असलेल्या या दुकलीचा डाव मुसद्दीपणाने, सभ्य व शाही इतमानात उधळून लावला.

*समरात चकमक करतां, ये कातीन तुमचे हातां ॥*
*चित्तात विक्षपकर्ता ॥*
*जा धरा वाट पुण्याची ,मी सून सुभेदाराची....*

या पोवाडयातून तत्कालीन शाहीर भास्करबुवा निरगुडकर यांनी या प्रसंगाचे रसभरीत वर्णन केले आहे.

११ डिसेबर १७६७ च्या सनदेने अहिल्याबाई होळकर वयाच्या ४२ व्या वर्षी सत्तेवर आरूढ झाल्या. यावेळी संपूर्ण हिंदुस्थानातील राजकीय परिस्थिती अत्यंत नाजुक होती. हिंदुस्थानचे मध्यवर्ती सत्ताकेंद्र दिल्ली खिळखिळी झाली होती. बादशहा अली गौहरच्या वतीने त्याचा मुलगा जवाँबख्त दिल्लीतून कारभार पाहत होता. मराठेशाहीची सातारची मुख्य गादी कलहाने निस्तेज झाली होती.

मराठे आपापसातील बखेड्यांनी एकमेकांचे पाय ओढत होते.पेशवाईचा जोर ओसरू लागल्याने धूर्त इंग्रजाचे कावेबाज प्रतिनिधी शनिवारवाड्याच्या पाय-या चढू लागले होते. पूर्वेकडील बंगाल, पश्चिमेकडचा सुरत पट्टा, दक्षिणेकडच्या मद्रास प्रांतात इंग्रजांची पकड मजबुत होत चालली होती.

एकंदरीत कावेबाज फिरंगी एक एक राज्य बळकावून संपूर्ण हिंदुस्थानात आपला सत्तेचा खुंटा बळकट करत चालले होते. अशा विपरीत परिस्थितीत खंबीरपणे, मुत्सद्दीपणा आणि अष्टावधानाची कसब वापरुन अहिल्यादेवींनी निग्रहाने मृत्यू येईपर्यंत २८ वर्षे लोकोपयोगी राज्यकारभार केला.

'शासनयंत्रणा राबवणं म्हणजे भोग नसून योग आहे. साधना आहे.' अशा त्या मानत. प्रजेला पुत्रवत मानून तिचे मनोभावे संगोपन, संवर्धन व संरक्षण त्यांनी केलं. नुसत्या सैन्यबळावर नव्हे तर मानवतेच्या अद्वितीय बळावर लोकांच्या मनावर राज्य करण्याचा पराक्रम अहिल्यादेवींनी केला. म्हणूनच त्या 'देवी' या पदावर पोचल्या.

स्वतःच्या माळवा प्रांताबरोबरच देशभर जनसेवेची पाणपोई उभारणाऱ्या तसेच मानवी मूल्याच्या संवर्धनामुळे केवळ राजमाता न राहता पुण्यश्लोक, लोकमाता, मातोश्री, लोकराज्ञी, गंगाजळ निर्मळ आदी नामाभिदानाने रयतेच्या मनातील ताईत ठरल्या.

या प्रजाहितदक्ष लोकराज्ञीच्या व्यक्तिमत्त्वाने प्रेरित होऊन सिद्धहस्त लेखकांनी त्यांच्यावर कादंबऱ्या लिहिल्या. नाटककारांनी नाटके, कवींनी काव्य रचली, संशोधकांनी चरित्रे लिहिली आणि शाहिरांनी पोवाडे रचलीत. तत्कालीन शाहीर प्रभाकर यांच्या 'धन्य धन्य कलियुगी' या पोवाडयातून...

*बांधिले घाट मठ फार*
*कुठे शिवास संतत धार*
*कुठे ठेवतां पाणी गार*
*त्यासाठी मुशाफिर कायें धांवत जाई*
*विश्रांत पावती पाहून आमराई*
*किती ग्रहण संधीतं तीलतुला त्या केल्या*
*कधी कनक रोप्य आणि कधीं गुळाच्या भेल्या*
*सांभाळ करुनि काशीस यात्रा नेल्या*
*कावडी शतावधी रामेश्वरी गेल्या...*

अहिल्याबाईंच्या कार्याचा दाखला दिला आहे.

राज्याचे अस्तित्व टिकवण्यासाठी मूलभूत कार्य उभे राहिले पाहिजे,यावर त्यांचा कटाक्ष होता. यामुळे त्यांनी अनेक लोकोत्तर कार्ये उभी केली. आजच्या राज्यकर्त्यांनीही धडे घ्यावेत असं अहिल्याबाईचं सुधारणावादी राजकारण आणि समाजकारण होते, ते पुढील मुद्द्याच्या आधारे स्पष्ट होते.

**लोककल्याणकारी राज्यकारभार :** पतीनिधनानंतर अत्यंत साधेपणाने वैयक्तिक जीवन जगून त्यांनी रयतेच्या कल्याणासाठी अलौकीक कार्य केले. त्यांचा वावर हा जरी माळव्यात असला तरी अवघ्या भरतखंडात त्यांच्या कर्तृत्वाच्या खुणा पसरलेल्या आहेत.

त्यांनी नद्यांवर घाट, विहिरी, प्रवासी मार्गावर धर्मशाळा, अन्नछत्र, जनावरांसाठी डोण्या, पाणपोया, पांथशाळा, संस्कार वर्ग, आमराया, आश्रयशाळा बांधून, मंदिराचे जीर्णोर्धार करून कारागीर व कलाकारांना आसरा दिला. देशातील उत्तम विणकरांना राजधानीत आणून तेथे वस्त्रोद्योगाला चालना दिली. लोककल्यानाचे व्रत अखंडपणे चालवत पुण्यश्लोक ही पदवी सार्थ ठरवली.

**शेती आणि शेतकरी हीतास प्राधान्य :** तत्कालीन परिस्थितीत रयतेच्या उत्पन्नाचा मुख्य स्त्रोत कृषी हाच होता. त्यानी आपल्या राज्यात शेतकरी व शेतीच्या हीताचा सदैव विचार केला. अहिल्यादेवीच्या मुलकी कारभारात खेतीहर किसानांच म्हणनं सर्वप्रथम विचारात घेतलं जाई.

बड्या असामींना देणे देतांना त्या घाई करत नसत, मात्र शेतकरी कारागीर यांना विना दिरंगाई मोबदला दिला जाई, शेतक-यांसाठी विविध सुविधा व आगाऊ कर्जाची व्यवस्था केली होती. भुमिहीनांना शेतीचे पट्टे वाटप करून त्यात फळझाडांची लागवड करण्यास प्रोत्साहित केल्या जात.

शेतीवरील कर हा उत्पन्नाप्रमाणे आकारण्यास सुरुवात केली. डोंगरद-यातील मुळनिवासी भिल्ल आणि इतर आदीवासी जमातींना त्यांचा भीलकवडी कर मान्य करून त्यांना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी त्यांचेकडून पडिक जमिनीची लागवड करून घेतली. जमीन करारपट्टयाने देण्याची पध्दत सुरु केली. राज्यात वस्त्रोद्योगांना उत्तेजन दिले.

**कर्तव्यकठोर प्रशासन :** अहिल्यादेवींची प्रशासनावर उत्तम पकड होतीच. करवसुली करण्याची रचना असो की बखेडाबंड मिटवणे, त्यांचा त्यात हातखंडा होता. व्यक्तिगत जीवनात दुःखांनी त्यांच्याशी पाठशिवणीचाच खेळ चालवला होता, पण त्याही परिस्थितीत त्यांची कर्तव्याला प्रथम प्राधान्य दिले.

प्रजेसाठी सुलभ नवे नियम त्यांनी तयार केले, तसेच जाचक नियम रद्द करून टाकले. राज्यातील उपद्रवी जमातींना समाजाच्या मुख्य प्रवाहात आणले. त्यांच्या उदरनिर्वाहासाठी कायमची व्यवस्था केली. राज्यात शांतता राखण्यासाठीच्या त्यांच्या प्रयत्नाचा इतिहासकार जॉन माल्कम यांनी आपल्या 'अ मेमोईर ऑफ सेंट्रल इंडिया इन्क्लुडिंग मालवा' या ग्रंथात गौरव केला आहे. अहिल्यादेवींच्या चरित्रात व्यवस्थापनाचे, अर्थनियोजनाचे, राजकारणाचे थडे सापडतात.

**धाडसी सुधारणावादी :** तत्कालीन रूढी-परंपरेची चौकट मोडून अमानवी सती प्रथेला त्यांनी विरोध केला.राज्यात हुंडाबंदी केली. विधवा स्त्रीयांना त्यांच्या इच्छेप्रमाणे दत्तक घेण्याचा अधिकार बहाल केला. 'माळव्यात उपद्रव माजवणाऱ्या लुटारूंचा जो शूर बंदोबस्त करेल, त्याच्याशी त्यांची एकुलती एक कन्या मुक्ताचा विवाह होईल.

यावेळी त्याचे सामाजिक स्थान व जातपात पाहिल्या जाणार नाही.' हा अलौकिक विचार जाहिर करून त्या थांबल्या नाहीत, तर त्यांनी कृतीही तशीच केली. स्त्रीच्या ज्या काळात सती जात होत्या, त्याच काळात अपरिहार्य कारणांमुळे मुलीचे लग्न मोडण्यास त्यांनी मान्यता दिली होती. इंदूरमधील माणिकलाल वाणी ओसवाल यांच्या कन्येच्या विवाह प्रेचप्रसंगात लग्न मोडलेल्या वधू मुलीच्या दुसऱ्या विवाहसाची रीतसर परवानगी अहिल्यादेवींनी आपल्या न्यायनिवाडयातून दिल्याचे उदाहरण सापडते. 'ज्या रूढी अंधाराकडून उजेडाकडे नेतात त्या रुढी आम्हाला मान्य आहेत. उजेडाकडून अंधाराकडे नेणाऱ्या प्रथापरंपरांना आम्ही अंधश्रद्धा मानतो', असे त्या म्हणत.

**अव्वल मुत्सद्दी :** 'अस्सल कागदपत्रानिशी हे सिद्ध करता येते की, अहिल्यादेवी अव्वल दर्जाच्या मुत्सद्दी होत्या ',असे इतिहासकार सर जदुनाथ सरकार यांनी नोंद करून ठेवली थाहे.

बारभाई राजकारणाच्या उत्तरार्धात नाना फडणीस, राघोबादादा, इंग्रज, महादजी, तुकोजी ही सत्तेच्या खेळातली माणसे त्यांच्याजवळचे धन ओढू पाहत होती. पण त्या कोणत्याही दबावाला बधल्या नाहीत.होळकरांच्या खजिन्यातील भरभरून वाहणाऱ्या या द्रव्यांच्या जनहितासाठीच उपयोग झाला पाहिजे, यावर त्यांचा कटाक्ष होता.

**संवेदनशिल :** संपूर्ण जगभरातील आणि देशातील राजे-रजवाडयांनी आपापल्या राज्यात लोकोपयोगी कामे केलीत; पण स्वतःच्या राज्याबाहेर देशभर लोक कल्याणाची पाणपोई उभारणाऱ्या अहिल्याबाई यांचे उदाहरण दुर्मिळ आहे.

त्यांनी जनसामान्यांची काळजी धोरणीपणाने घेतलीच; पण पशुपक्षांसाठी जंगले आणि कुरणे संरक्षित केली. अगदी मुंग्यासाठी साखर, जलचरांसाठी खाद्य याची तजवीज केली. दैनिक दानधर्म आटोपल्यावर शिल्लक धान्य पक्षांसाठी ठेवण्याचा त्याचा दंडक होता.

**हिशेबात चोख :** हिशेबाच्या बाबतीत त्या फार दक्ष असत. सरकारी दौलतीचा एक छदामाही खासगीसाठी वापर करू नये, असा त्यांचा दंडक होता. त्यांचा राज्यातील कर पध्दती अत्यंत चोख होती. गवताच्या पेंढीचाही चोख हिशेब ठेवल्या जात होता.यामुळेच त्यांच्या राज्यात शेती, उद्योग आणि व्यापाराचा उत्कर्ष झाला.

**वस्तुनिष्ठ न्यायदान :** बड्या घरातील घरंदाच स्त्रिया असोत वा सामान्य संसारी बाई, कुणीही त्यांच्यापर्यंत गाऱ्हाणे मांडू शकत होत्या. न्यायदानाची पध्दत वस्तुनिष्ठ होती. सिरोजमधील खेमदास नावाच्या व्यापा-याच्या निधनानंतरच्या वारस प्रकरणात त्यांनी केलेला निवाडा एक उत्तम नमुना आहे. सर जॉन माल्कमने, 'अहिल्यादेवी सारख्या न्यायाधीश होणे नाही.'असे उद्गार काढले आहेत.

**व्यवस्थापन निपून :** अहिल्याबाईच्या व्यवस्थापनाची सर्व वैशिष्ट्ये बुळे प्रकरणात दिसतात त्यांनी गोविंद बुळे या सरदाराला मुजोर होऊ दिले नाही,की त्याच्यावर आज्ञाभंगाच्या आकसापोटी सूड उगवला नाही.

केवळ आपलेच घेणे परत मिळवून त्याला वाऱ्यावरही सोडले नाही. तत्कालीन परिस्थितीत दुरदर्शीपणाने बाईंनी आपले राजदूत अयोध्या, उदयपूर, कोटा, ग्वालेर, दिल्ली, जयपूर, देवळेप्रतापगड, डुंगरपुर, भोपाळ, हैदराबाद, पुणे इत्यादी ठिकाणी नियुक्त करून केले होते.

**साहित्य आणि संस्कृतीचा विकास :** छापखाने नसलेल्या त्या काळात अहिल्याबाईचा ग्रंथसंग्रह मोठा व दुर्मिळ होता. मध्ययुगात महत्वाचे मानले जाणारे निर्णय सिंधू, द्रोणपर्व, मुहूर्त चिंतामणी, वाल्मिकी रामायण, ज्ञानेश्वरी, मथुरा माहात्म्य, पद्मपुराम, श्रावणमास माहात्म्य इत्यादी ग्रंथ त्यांच्या संग्रही होते व त्या रयतेसोबत त्यांचे दैनिक परिपाठ करीत. त्यांनी आपल्या राज्यात अनेक विद्वान पंडीत, साहित्यिक, संगीतकार, चित्रकार, शिल्पकार यांना राजाश्रय दिला होता. मोरोपंत व शाहीर आनंद फंदी यांचा यथोचित आदरसत्कार केला होता.

राजकारण, मुत्सद्दीपना, दूरदृष्टी, धडाडी, गुणग्राहकता, उद्योजकता, वात्सल्यभान, सौंदर्यदृष्टी, सात्विकता, व्यवहारचतूर या सगळ्यांचे एकच सार म्हणजे पुण्यश्लोक अहिल्यादेवी होय. या थोर लोकमातेस त्यांच्या ३०० व्या जयंती निमित्त विनम्र अभिवादन!

■ ■ ■

# सावधान ! तंबाखू, खैनी, गुटखा, खर्रा घातकच

संपूर्ण जगातील लोकांना तंबाखू पासून मुक्ती मिळावी व आरोग्य सुदृढ रहावे या उद्देशाने तंबाखू व धुम्रपान यापासून होणारा त्रास दुर करण्याकरीता तंबाखू निषेध दिवस साजरा केल्या जातो. जागतिक आरोग्य संघटना डब्लुएचओच्या सदस्य देशांनी तंबाखू सेवनाने होणाऱ्या बिमारीचा मृत्यू दरात वाढ झाल्यामुळे १९८७ ला महामारी घोषीत करण्यात आली व तंबाखू निषेध दिवस साजरा करण्याचा सल्ला देण्यात आला. ८ एप्रिल १९८८ ला डब्लुएचओने वर्षगाठ साजरी केली व याच दिवशी ३१ मे तंबाखू निषेध दिवस साजरा करण्याची घोषणा केली. तेव्हापासून ३१ मे जागतिक तंबाखू निषेध दिवस साजरा केल्या जातो.

------------------

डब्लुएचओने तंबाखू सेवनाने होणाऱ्या २५ प्रकारच्या शारीरिक आजार पाहता व ४० प्रकारचे कॅन्सर पहाता आणि या बिमारीचा वाढता मृत्यू दर पहाता याला महामारी घोषीत केली. डब्लुएचओच्या माहितीनुसार जगात तंबाखूने किंवा धुम्रपान केल्याने दरवर्षी ८० लाखांपेक्षा जास्त लोकांना आपले प्राण गमवावे लागतात. यावर जगातील देशांनी नियंत्रण ठेवले नाही तर मृत्यूचा आकडा दुप्पटीने वाढु शकतो.

कोणत्याही नशेली पदार्थाचे अती सेवन करणे म्हणजे मृत्यूला कवटाळले होय. मानवाची जगण्याची दशा, दीशा ठरवणे हे मानवाच्या मनावर असते. परंतु आपल्या मनावरचा ताबा सोडून नशेली पदार्थाचे सेवन केले तर स्वतःला व परिवाराला घातक सिध्द होवू शकते.

तंबाखूच्या सेवनाने कॅन्सर सारखे महाभयानक आजाराने मानुस जखडतो आणि यांचा दुषपरीणाम संपूर्ण परीवाराला भोगावा लागतो. ह्याबाबी मानवाने स्वतः समजून घ्यायला हव्यात. कोणत्याही नशेच्या बाबतीत सरकारचे दुटप्पी धोरण आपल्याला पहायला मिळते. सरकार नशेली वस्तुची खुलेआम विक्री करण्यास प्राधान्य देते व मोठ्या प्रमाणात परवाने सुध्दा देते आणि दुसरीकडे नशा न करण्याचे आव्हान करते याला कोणते धोरण म्हणावे?

मध्यंतरी महाराष्ट्रात दारू-वाईन किराणा दुकान विक्रीला ठेवता येईल या चचेर्चा मोठे उधाण आले होते.या चचेर्चा सर्वच स्तरातून निषेध करण्यात आला. त्यामुळे ताबडतोबच या चर्चेवर पुर्णविराम लागला. सरकारने नशाबंदीचे मोठ-मोठे सरकारी ऑफिसेस खोललेली आहेत. याकरीता देशभरात लाखो कर्मचारी कार्यरत असतात.

याव्यतिरिक्त अनेक रजिस्टर्ड सामाजिक संस्था व्यसनमुक्तीसाठी कार्य करतांना दिसतात. परंतु सरकार स्वतःहुन नशेली पदाथार्चे उत्पादन बंद करायला तयार नाही. कारण नशेली (मद्य, तंबाखू, खैनी, सिगारेट, बिडी, गुटखा, गांजा इत्यादी) वस्तुपासुन राज्य व केंद्र सरकारला मोठ्या प्रमाणात महसूल (रेव्हेन्यू) मिळत असतो व त्यावर सरकारचा कारभार चालतो.

यावरून स्पष्ट होते की सरकार पैसा कमविण्याकरीता दुटप्पी धोरण अवलंबुन मानवाचे जीव धोक्यात टाकत आहे. कोव्हीड-१९ च्या महामारीच्या काळात संपूर्ण भारतासह अनेक राज्यांमध्ये लॉकडाउन होता याकाळात दारूची दुकाने खोलण्याची मागणी सर्व प्रथम राजकीय पुढाऱ्यांची होती आणि अनेक राज्यांमध्ये लॉकडाउनच्या काळात दारूची दुकाने खोलण्यात आली.

यामुळे सरकारच्या तिजोरीत करोडो रुपयांचा महसूल रूपात पैसा जमा झाला.यावरून स्पष्ट होते की पैशासाठी सरकार लोकांना व्यसनाधीन करीत आहे. लॉकडाउनच्या काळात दारू, सिगारेट, बीडी, तंबाखू, खैनी, गुटखा, खर्रा, गांजा याचा मोठ्या प्रमाणात तुटवडा होता ह्या वस्तु अवैधरीत्या दुप्पटीने किंवा तिपटीने लोकांनी घेतल्या. परंतु नशा सोडण्याला कोणीही महत्त्व दिले नाही.

लॉकडाउनच्या काळात लोकांना नशा सोडण्याची सुवर्णसंधी होती. परंतु नशेली वस्तुंची दुकाने खुलताक्षणी सोशल डिस्टिंक्शनची धज्जीया उडवून नशेली वस्तु घेण्याकरिता ३ किलोमिटर पर्यंत लोक रांगेत उभे होते. अशाने कोणत्याही नशेवर आळा बसणार नाही. प्रत्येकानी



जर आपल्या मनावर ताबा ठेवला तर कोणीही नशेच्या आहारी जावु शकत नाही. कोणतीही नशा असो ती घातकच असते. परंतु अती नशा मृत्यूच्या खाईत नेल्या शिवाय रहाणार नाही.

त्यामुळे कोणतीही नशा करतांना सावधगिरी बाळगली पाहिजे. अन्यथा जिवीत हानी अटळ आहे. तंबाखू, गुटखा, खैनी, खर्रा, सुपारी, दारू यापासून शरीराच्या कोणत्याही अवयवांच्या विकासासाठी चालना देत नाही मग या वस्तूचे सेवन का करावे?

कोणतीही नशा असो ती शरीराचा विकास तर करीत नाहीच उलट शरिराला छिन्नविछिन्न करण्याचे काम करीत असते व स्लोपॉयझनचे काम करून मृत्यूला जवळ करीत असते.

आपण साधारणतः नशेली वस्तू व पोषक वस्तू यांचा विचार केला तर मनुष्यासाठी नशेली वस्तूंच्या तुलनेत पोषक वस्तू खुपचं स्वस्त असतात. उदाहरण द्यायचे झाले तर बादाम १००० रुपए किलो यांच्या तुलनेत गुटखा ४४०० रुपए किलो, शुद्ध तुप ६०० रुपए किलो यांच्या तुलनेत तंबाखू १७०० रुपए किलो, सफरचंद१०० रुपए किलो यांच्या तुलनेत सुपारी ६०० रुपए किलो, दुध ५० रुपए लिटर यांच्या तुलनेत दारू ६०० रुपए लिटर अशा प्रकारे अशा अनेक पोष्टीक वस्तू आहेत की त्यांची किंमत नषेली वस्तू पेक्षा कितीतरी पटीने स्वस्त व कमी आहेत.

परंतु नशा करणारे बहादर नशेला जास्त महत्त्व देतात हे त्यांचे दुर्भाग्य म्हणावे लागेल. कोव्हीड-१९ च्या महामारी पासून सरकारने रस्त्यावर थुंकण्यावर बंदी घातली होती त्याचप्रमाणे सरकारने तंबाखू, गुटखा, खैनी, खर्रा, गांजा यावर सुध्दा बंदी घालायला पाहिजे होती. यामुळे मृत्यू दर कमी होण्यास मोठी मदत होईल.

करोना काळात कोरोना महामारीचा प्रकोप दीवसेंदीवस वाढत असतानाच केंद्रशासित प्रदेशासह २८ राज्यांनी तंबाखू व धुम्रपानामुळे कोरोणाची लागन होण्याची शक्यता पहाता. त्यातच फुफ्फुसाचा कर्करोग होतो किंवा रोगप्रतिकारक शक्ती कमी होते असे आरोग्य तज्ञांचे म्हटले होते.

या पार्श्वभूमीवर तंबाखू, गुटखा, खैनी, खर्रा सेवन आणि सार्वजनिक ठिकाणी थुंकण्यावर बंदी घालने उचीत होते तीच पद्धत नेहमीसाठी सरकार कडून अमलात यायला हवी. सध्याच्या परीस्थितीत युवापिढी धुम्रपानाच्या आहारी जातांना दिसत आहे.त्यांनी मनावर ताबा ठेवुन धुम्रपानाचा विरोध करावा व युवकांनीच जगाला संदेश देवुन धुम्रपानाचा निषेध केला पाहिजे.

कोणत्याही नशेली वस्तुंसाठी रांगेत उभे रहाने म्हणजे मृत्यूच्या रांगेत उभे रहाल्यासारखे आहे.याची जाणिव आजच्या युवा पिढीने लक्षात ठेवली पाहिजे. सरकारने कितीही नशेली वस्तु विकण्याचा प्रयत्न केला तरीही आपण जर आपल्या मनावर ताबा ठेवला तर कोणतीही नशेली वस्तु तुम्हाला स्पर्श सुध्दा करू शकत नाही हेसुद्धा तेवढेच सत्य आहे.

त्यामुळे सध्याच्या परिस्थितीत कोणीही रस्त्यावर तंबाखू,खर्रा किंवा इतर नशेली वस्तू थुंकु नये याची काळजी घ्यायला हवी. कारण रस्त्यावर थुंकल्याने अनेक बिमाऱ्यां व संक्रमनात मोठ्या प्रमाणात वाढ होवून आरोग्य धोक्यात येऊ शकते. त्यामुळे कोणत्याही नशेपासुन सावधगिरी बाळगली पाहिजे. आपण सुदृढ राहिलो तर आपली पिढी सुदृढ राहील.

त्याचप्रमाणे आपण सुरक्षीतरीत्या जगलो तर तर देश सुरक्षित राहील, देश सुरक्षित रहाला तर जग अवश्य सुरक्षित होईल. त्यामुळे तंबाखू खर्रा खावुन रस्त्यावर थुंकु नका व कोणत्याही महामारीला जाहीर आमंत्रण देवु नका ही आग्रहाची आणि कळकळीची विनंती आहे. याकरीता तंबाखू निषेध दिनाच्या निमित्ताने आपण संकल्प करूया की यानंतर धुम्रपान व इतर नशेली वस्तूला टाटा-बाय-बाय करूया.

------------------

**रमेश कृष्णराव लांजेवार**
**स्वतंत्र पत्रकार, नागपूर.**
**९९२१६९०७७९**

# महिलांना प्रतिकारक्षम करण्याचे उपक्रम



महिलांच्या आर्थिक, सामाजिक, शैक्षणिक तसेच आरोग्य विषयक समस्या सोडविण्यासाठी आणि त्यांचा सर्वांगीण विकास होण्याच्या दृष्टीने वर्ष २०२५-२६ पासून राज्यात आदिशक्ती अभियान राबवण्यात येणार असल्याची माहिती राज्याच्या महिला आणि बाल विकास मंत्री आदिती तटकरे यांनी आपल्या एक्स खात्यावरून दिली.

या मोहिमेद्वारे महिलांसाठी राज्यात राबविण्यात येत असलेल्या विविध शासकीय योजना, उपक्रम, कार्यकम आदींबाबत आवश्यक आणि उपयुक्त माध्यमांद्वारे प्रचार आणि प्रसिद्धी देऊन जनजागृती करण्यात येणार आहे त्यासोबतच ग्रामस्तरीय समित्यांना 'आदिशक्ती पुरस्कार' देऊन गौरविण्यात येणार आहे.

राज्यातील एकूण लोकसंख्येच्या सुमारे ६० टक्के लोकसंख्या महिला आणि बालके आहेत. शासनाकडून राबविण्यात येणाऱ्या सर्व महिलाभिमुख योजनांचा लाभ समाजातील शेवटच्या घटकातील महिलांपर्यंत पोहोचविणे हा या अभियानाचा मुख्य उद्देश आहे.

महिलांच्या आर्थिक, सामाजिक, शैक्षणिक आणि आरोग्य विषयक समस्यांबाबत समाजात संवेदनशीलता निर्माण करणे व जनजागृतीच्या माध्यमातून चळवळ निर्माण करणे, अभियानाच्या माध्यमातून महिलांच्या समस्यांवर कायमस्वरूपी उपायोजना करणे तसेच महिलांचे सर्वांगीण सक्षमीकरण करण्याच्या दृष्टीने हे अभियान राबविण्यात येत असल्याची माहिती तटकरे यांनी दिली आहे.

आजमितीला महिलांच्या विकासासाठी राज्य सरकार अनेकविध योजना राबवत आहे मात्र तळागाळापर्यंत त्या पोहोचत नसल्याने किंवा अनेकांना त्याबाबत पुरेसे ज्ञान नसल्याने महिला त्यांपासून वंचित राहतात त्यादृष्टीकोनातून सरकारतर्फे राबवण्यात येणारा हा उपक्रम नक्कीच स्तुत्य आहे.

मात्र सध्याची सामाजिक स्थिती पाहता महिलांना केवळ आर्थिक, सामाजिक, शैक्षणिक आणि आरोग्य दृष्ट्या सक्षम करणे पुरेसे नसून तिला शारीरिकदृष्ट्या प्रतिकारक्षम करणेही तितकेच महत्वाचे आहे.

प्रत्येकाच्या हातात आलेले मोबाईल्स, त्यावर इंटरनेटचा होत असलेला मुक्त वापर, सेन्सॉरची कोणतीच बंधने नसलेल्या तसेच अश्लील आणि हिंसक दृश्यांचा भरणा असलेल्या वेब सिरीज, शाळा-महाविद्यालयीन विद्यार्थ्यांकडून पाहिल्या जाणाऱ्या पॉर्न वेबसाईट्स, तरुण मुला मुलींना पालकांकडून दिली जाणारी वारेमाप मोकळीक, चित्रपट, डेलीसोप यांमधून विवाहबाह्य संबंध, लिव्ह इन रिलेशनशिप, समलैंगिकता, अनैतिकता यांना दिले जाणारे प्रोत्साहन या सर्वांचा एकत्रित परिणाम म्हणून आज स्त्री अत्याचारांच्या घटनांत कमालीची वाढ झाली आहे.

कोणतेही क्षेत्र महिलांसाठी सुरक्षित राहिलेले नाही. ज्यांच्यावर डोळे झाकून विश्वास ठेवावा असे जवळचे नातेवाईक, पोलीस, डॉक्टर, शिक्षकसुद्धा वासनाधीन होऊ लागले आहेत. तीन वर्षाच्या बालिकेपासून ८० वर्षाच्या वृद्धासुद्धा वासनांधांच्या बळी ठरू लागल्या आहेत.

अशा प्रतिकूल परिस्थितीत स्त्रीला तिच्या शीलरक्षणासाठी सक्षम करणे गरजेचे आहे. आजची स्त्री व्यावहारिक जगात पुरुषांच्या खांद्याला खांदा लावून पुढे जात आहे. मात्र जेव्हा समाजातील वासनांधता तिला गिळंकृत करू पाहते तेव्हा ती निर्बल ठरताना दिसत आहे.

सुशिक्षित आणि सुज्ञ असूनही हुंडयासाठी जेव्हा तिचा छळ केला जातो तेव्हा ती शक्तिहीन झालेली दिसते. परिस्थितीला सामोरे जाण्याचे बळ नसल्याने आत्महत्येचा मार्ग स्वीकारताना दिसते. भारतभूमी ही शौर्याची भूमी आहे.

आजवर या भूमीवर राजमाता जिजाऊ, राणी लक्ष्मीबाई, राणी चेन्नम्मा, राणी येसूबाई यांसारख्या वीरांगना होऊन गेल्या ज्यांनी आपल्या सैन्यबळाचे नेतृत्व करून शत्रूवर तुटून पडल्या. पहलगाम हल्ल्याच्या प्रतिशोधार्थ भारताने राबवलेल्या ऑपरेशन सिंदुरच्या मीडिया ब्रिफींगचे चे नेतृत्व विंग कमांडर व्योमिका सिंग आणि कर्नल सोफिया कुरेशी या दोन महिलांनी केले.

या सर्वांचे आदर्श आजच्या स्त्रीपुढे असायला हवेत. सरकारने आखलेल्या अभिनव उपक्रमाला 'आदिशक्ती' हे नाव दिले आहे. आदिशक्तीने दृष्टांच्या संहारासाठी आणि भक्तांच्या रक्षणासाठी प्रसंगी अवतार घेतले आहेत. तिच्या प्रत्येक हातात शस्त्र आहेत.

या शस्त्रांचा वापर करून तिने असुरी शक्तींचे निर्दालन केले आहे त्यामुळे या उपक्रमाच्या अंतर्गत स्त्रियांना शारीरिकदृष्ट्या सबळ आणि प्रतिकारक्षम करण्याचे काम सरकारने हाती घ्यायला हवे.

ज्याची सुरुवात शाळा महाविद्यालयांपासून करायला हवी. शालेय अभ्यासक्रमासोबत मुलींच्या सबलीकरणासाठी स्वरक्षण प्रशिक्षणवर्गही घेतले जावेत. जेणेकरून भविष्यातील स्त्री केवळ व्यावहारिकदृष्ट्याच नव्हे तर शारीरिक आणि मानसिकदृष्ट्याही सक्षम असेल. संकटांना धैर्याने सामोरी जाणारी असेल, प्रतिकूल परिस्थितीवर मात करणारी असेल.

---------------

**जगन घाणेकर**
**घाटकोपर, मुंबई**
**९६६४५५९७८०**

■ ■ ■

# २६५२ लाडक्या बहिणी निघाल्या सरकारी कर्मचारी

## फसवणूक करून घेतला लाभ : साडेतीन कोटी रुपये वसूल करणार



■ **महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि.३० :** राज्य सरकारी कर्मचाऱ्यांनी लाडकी बहिण योजनेचा गैरवापर केल्याच्या तक्रारी आल्यानंतर, १,६०,५५९ पुरुष आणि महिला कर्मचाऱ्यांची चौकशी करण्यात आली. २६५२ महिला कर्मचाऱ्यांनी या योजनेअंतर्गत फसवणूक करून लाभ घेतल्याचे उघड झाले आहे.

सामान्य प्रशासन विभागाने या १,६०,५५९ कर्मचाऱ्यांचा युआयडी डेटा माहिती आणि तंत्रज्ञान विभागाला प्रदान केला. या कर्मचाऱ्यांची सेवार्थ प्रणालीमध्ये नोंदणी करण्यात आली होती. त्यापैकी किती जणांना लाडकी बहिण योजनेचा लाभ मिळाला हे शोधण्यासाठी मोहीम सुरू करण्यात आली. २६५२महिला कर्मचाऱ्यांच्या बँक खात्यात थेट निधी जमा झाल्याचे आढळून आले.

ऑगस्ट २०२४ ते एप्रिल या कालावधीत या प्रत्येक महिलांना १३५०० रुपये मिळाले, एकूण ३.५८ कोटी रुपये बेकायदेशीरपणे मिळाले. सरकारी धोरणात स्पष्टपणे म्हटले आहे की, सरकारी कर्मचारी या योजनेसाठी पात्र नाहीत. तथापि, या कर्मचाऱ्यांनी माहिती असूनही अर्ज केला आणि त्यांना लाभ मिळाले. त्यापैकी बहुतेक वर्ग ३ आणि वर्ग ४ सेवा श्रेणीतील आहेत. अशाच प्रकारे अतिरिक्त सहा लाख कर्मचाऱ्यांची छाननी केली जाणार आहे.

**निधी वसूल करणार**

लाडकी बहिण योजनेचा बेकायदेशीरपणे लाभ घेणाऱ्या २६५२ महिला कर्मचाऱ्यांना मिळालेले ३.५८ कोटी रुपये आता सरकार वसूल करेल. सामान्य प्रशासन विभाग लवकरच सर्व सरकारी विभागांना या वसुलीसाठी आदेश जारी करेल.

**दोन सरकारी योजनांचा लाभ**

तपासातून असे दिसून आले आहे की नमो शेतकरी योजना आणि लाडकी बहिण योजनेतून ८,८५,००० महिलांनी आर्थिक लाभ घेतला. या महिलांना लाडकी बहिण योजनेअंतर्गत दरमहा १५०० रुपये मिळाले. त्याचबरोबर, त्यांना केंद्र आणि राज्य सरकारकडून प्रत्येकी ६००० रुपये (एकूण १२००० रुपये) नमो शेतकरी योजनेअंतर्गत मिळाले, जे एकूण वार्षिक ३०००० रुपये होते.

तथापि, सरकारी नियमांनुसार, एकत्रित सरकारी योजनांमधून एखाद्या व्यक्तीला दरवर्षी फक्त १८००० रुपये मिळू शकतात. यापुढे, या महिलांना नमो शेतकरी योजनेतून दरवर्षी फक्त १२०००रुपये आणि लाडकी बहिण योजनेतून ६००० रुपये मिळण्यास पात्र असतील.

दरम्यान, आता चुकीच्या पद्धतीने योजनेचा लाभ घेणाऱ्या महिला कार्मचाऱ्यांची धावपळ सुरू आहे.

# झाडे तोडण्यापूर्वी वृक्षारोपण बंधनकारक



## नागपूर खंडपीठाचा महत्त्वाचा निर्णय

■ **महासागर प्रतिनिधी नागपूर, दि. ३० :** वृक्षतोड आणि प्रतिपूरक वृक्षारोपणाबाबत मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने एक महत्त्वाचा आदेश दिला आहे. झाडे तोडण्याची परवानगी देण्यापूर्वी भरपाई वृक्षारोपणाची अट समाविष्ट करणे आवश्यक आहे. हा नियम सार्वजनिक आणि खाजगी प्रकल्पांना लागू होईल.

न्यायालयाला असे आढळून आले की २०१९ ते २०२५ पर्यंत नागपुरात ६३५६ झाडे तोडण्याची परवानगी देण्यात आली होती. प्रतिपूरक म्हणून ८९३०८ रोपे लावल्याचा दावा करण्यात आला होता. परंतु त्यांच्या जगण्याचा दर आणि देखरेखीबद्दल कोणतीही माहिती नाही.

नागपूर शहराच्या विकासासाठी वृक्ष कायद्यातील तरतुदींचे नियमांचे पालन न करता १३७४ झाडे तोडण्याचा प्रस्ताव असल्याचा दावा करणारी जनहित याचिका प्रीती पटेल आणि इतर तीन नागरिकांनी नागपूर खंडपीठात दाखल केली होती.

या याचिकेवर न्यायमूर्ती नितीन सांबरे आणि न्यायमूर्ती वृषाली जोशी यांच्यासमोर सुनावणी झाली. न्यायालयाने १० वर्षांचा डेटा मागितलापरवानगी आणि वृक्षारोपणाचा डेटा रेकॉर्डवर उपलब्ध आहे. प्रत्यक्षात किती झाडे लावली गेली आणि त्यांचे अस्तित्व स्पष्ट करण्यासाठी कोणताही डेटा प्रदान केलेला नाही.

झाडे तोडण्याच्या परवानगीमध्ये भरपाई वृक्षारोपणाची अट समाविष्ट आहे. परंतु झाडे लावली गेली की नाही आणि त्यांचा जगण्याचा दर किती आहे याचे कोणतेही निरीक्षण किंवा ऑडिट नाही.

न्यायालयाने आदेश दिला की झाडे तोडण्याची परवानगी देण्यासोबतच परवानगी घेऊन भरपाई देणारी वृक्षारोपण अनिवार्यपणे करावी लागेल.यासाठी जबाबदार व्यक्ती किंवा प्राधिकरणाला वृक्ष अधिकाऱ्यांना प्रतिज्ञापत्रासह अनुपालन अहवाल सादर करावा लागेल.

न्यायालयाने महापालिकेला गेल्या १० वर्षातील वृक्षतोड आणि वृक्षारोपणाचा डेटा १३ जून २०२५ पर्यंत प्रतिज्ञापत्रासह सादर करण्याचे आदेश दिले आहेत. या प्रकरणाची पुढील सुनावणी १६ जून रोजी होणार आहे.

याचिकाकर्त्यांच्या वतीने ॲड. मृणाल चक्रवर्ती यांनी तर महापालिकेच्या वतीने ॲड. जेमिनी कासट यांनी युक्तिवाद केला.जिओ-टॅगिंग सुचवलेन्यायालयाने असेही आदेश दिले की लावलेल्या झाडांची ७ वर्षे काळजी घ्यावी लागेल.

ही जबाबदारी परवानगी मिळालेल्या व्यक्तीची किंवा प्राधिकरणाची असेल. नवीन झाडांचे जिओ-टॅगिंग करावे जेणेकरून त्यांचे निरीक्षण पारदर्शक होईल, असेही न्यायालयाने सुनावणीवेळी सुचवले.

# जयंत पाटील यांच्या भूमिकेवर पक्षात नाराजी



■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि.३० :** राष्ट्रवादी काँग्रेसच्या शरदचंद्र पवार पक्षात प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांच्या भूमिकेविषयी अलीकडच्या काळात अनेकदा नाराजीचे सूर उमटले आहेत. विशेषतः विधानसभा निवडणुकीतील अपयशानंतर पक्षात अंतर्गत मतभेद आणि नेतृत्वाबाबतही चर्चा सुरू झाल्या आहेत. त्यातच जयंत पाटील यांचा कार्यकाळ पूर्ण होत असताना त्यांनी काही नियुक्त्या केल्या आहेत. त्यामुळे पक्षातील तरुण नेते नाराज असल्याचे बोलले जात आहे.

या नाराज तरुण नेत्यांमध्ये आमदार रोहित पवार आणि आमदार रोहित पाटील यांचा देखील समावेश असल्याची चर्चा आहे. या नाराज नेत्यांनी त्यांची नाराजी थेट शरद पवार यांच्यापर्यंत पोहोचवली आहे. त्यामुळे शरद पवार आता भाकरी फिरवणार का? ते नेमकी कोणती भूमिका घेतात, हे आता पहावे लागेल.

विधानसभा निवडणुकीत शरद पवार गटाला अपेक्षित यश मिळाले नाही. या पराभवानंतर काही नेत्यांनी अजित पवार गटातील नेत्यांशी जवळीक साधल्याने कार्यकर्त्यांमध्ये संभ्रम निर्माण झाला. या संदर्भात जयंत पाटील यांनी पक्षाच्या बैठकीत आक्रमक भूमिका घेतली आणि अशा नेत्यांना सुनावले.

जयंत पाटील यांनी काही दिवसांपूर्वी केलेल्या ₹माझं काही खरं नाही₹ या विधानामुळे त्यांच्या नाराजीच्या चर्चा रंगल्या होत्या. तथापि, त्यांनी बारामतीत शरद पवार यांची भेट घेऊन या चर्चांना पूर्णविराम दिला होता. त्यांनी स्पष्ट केले की, ₹मी नाराज नाही. माझं वक्तव्य चुकीच्या संदर्भात घेतले गेले. त्यांनी माध्यमांवर ही नाराजी व्यक्त केली होती की, माझ्या विधानाचा विपर्यास करण्यात आला.

**पक्षातील अंतर्गत बदल**

पक्षात काही पदाधिकाऱ्यांनी रोहित पवार आणि रोहित पाटील यांना महत्त्वाची जबाबदारी देण्याची मागणी केली आहे. या पार्श्वभूमीवर जयंत पाटील यांनी पक्षातील काही प्रवक्त्यांच्या नियुक्त्या रद्द केल्या होत्या, ज्यामुळे पक्षात अंतर्गत वाद उफाळून आला होता. आता पुन्हा अशीच चर्चा सुरु झाली आहे. त्यामुळे युवा पदाधिकारी आणि कार्यकर्ते नाराज आहेत.

जयंत पाटील यांनी स्पष्ट केले आहे की, ते शरद पवार यांच्या नेतृत्वात काम करत राहणार आहेत. त्यांनी पक्ष सोडण्याच्या चर्चांना खोडून काढले आहे. तथापि, पक्षातील अंतर्गत मतभेद आणि नेतृत्वाबाबतही चर्चा अद्याप सुरूच आहे. त्यात शरद पवार यांचा पक्ष अजित पवार यांच्यासोबत जाण्याचीही चर्चा सुरु आहे. त्यात प्रदेशाध्यक्ष पद हा अडथळा ठरु शकतो. त्यामुळे जयंत पाटील यांच्या भूमिकेवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले जात आहे.

# ई-बसेसच्या पुरवठ्यावर सरनाईकांचा जोर



■ **महासागर प्रतिनिधी मुंबई, दि.३० :** राज्यात प्रवाशांना दर्जेदार आणि पर्यावरणपूरक वाहतूक सेवा मिळावी, यासाठी राज्य सरकारकडून महत्त्वपूर्ण पावले उचलली जात आहेत. परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी आज इवे ट्रान्स प्रा. लि. कंपनीला स्पष्ट शब्दांत निर्देश दिले की, नवीन वेळापत्रकानुसार ई-बसेसचा पुरवठा त्वरित सुरू करावा, जेणेकरून प्रवाशांना अपेक्षित सेवा मिळू शकेल.

मंत्रालयात आयोजित बैठकीत मंत्री सरनाईक यांनी बस पुरवठा प्रक्रियेचा आढावा घेतला. यावेळी अपर मुख्य सचिव संजय सेठी, एसटी महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक डॉ. माधव कुसेकर, तसेच कंपनीचे प्रतिनिधी के. व्ही. प्रदीप उपस्थित होते.

राज्य सरकारने इवे ट्रान्स कंपनीसोबत ५१५० इलेक्ट्रिक बसेस भाडेतत्त्वावर घेण्याचा करार केला आहे. मात्र आतापर्यंत फक्त २२० बस पुरवण्यात आल्या आहेत. यामुळे उर्वरित बस पुरवठा लवकरात लवकर पूर्ण करावा, असे सरनाईक यांनी स्पष्ट केले.

ई-बसेस चालविताना महामंडळाला प्रति किमी १२ ते १६ रुपये तोटा सहन करावा लागत असून, पुढील काही वर्षांत हा तोटा ३१९१ कोटी रुपयांवर जाऊ शकतो. त्यामुळे व्यवहार्यता अंतर अर्थपुरवठा अंतर्गत राज्य शासनाकडून निधी मिळावा, यासाठी प्रस्ताव पाठवण्यात येणार आहे.

महामंडळाने आता पर्यंत ६० कोटी रुपये कंपनीला अदा केले असून, उर्वरित ४० कोटी रुपयांचे बिल लवकरच दिले जाणार आहे. या व्यवहारासाठी खास इलेक्ट्रिक बस उत्पन्न विभाग स्थापन करण्यात आला आहे.

**मुख्यमंत्री-उपमुख्यमंत्र्यांची बैठक होणार**

या कराराला अंतिम रूप देण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यासोबत बैठक घेण्यात येणार असल्याची माहिती परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी पत्रकार परिषदेत दिली.

या बैठकीतून पुढील धोरण निश्चित होण्याची शक्यता असून, राज्यातील ई-बसेसचे भविष्य त्या निर्णयावर अवलंबून राहणार आहे. प्रवाशांसाठी चांगल्या सेवा आणि राज्याच्या हरित वाहतूक स्वप्नासाठी ही प्रक्रिया महत्त्वपूर्ण ठरणार आहे.



**लोकमानस**

: मुलखांवेगळी माणसं :

## छंद ट्रेनची मॉडेल्स बनविण्याचा

व्यक्ती तितक्या प्रकृती या तत्वानुसार अनेकांना अनेक प्रकारचे छंद असतात. कोणाला स्टॅम्प जमविण्याचा छंद असतो, तर कोणाला विविध प्रकारची नाणी जमविण्याचा छंद असतो, तर कोणी मोठ्या कतृत्ववान व्यक्तींच्या सह्याच जमवित असतो.

परंतू काही जण केवळ स्वतःला मिळणारे समाधानासाठी अफलातून छंद जोपासतात. असाच एका डोंबिवलीचा एक हरहुन्नरी तरुण रेल्वे इंजिन आणि मेल-एक्सप्रेसची विविध मॉडेल्स घरात तयार करण्याचा छंद गेली अनेक वर्षे जोपासत आहे. डोंबिवलीचा सुभाष राव याला लहानपणापासून रेल्वे प्रवासाची आवड होती.

तो रहात असलेल्या डोंबिवलीत त्याने बालपणापासून रेल्वेला जवळून पाहीले आहे. एल. के. रहेजा स्कूल ऑफ आर्ट्समधून शिक्षण पूर्ण झाल्यावर एका प्रसिद्ध एडव्हार्टायझिंग कंपनीत तो कामाला आहे. परंतू त्याच्या रेल्वेची विविध इंजिन आणि स्केल मॉडेल्स तयार करण्याच्या छंदाला त्याने जोपासत त्याने त्यात अनेक प्रकारचे प्रयोग करीत वैविध्य आणले आहे.

सुभाषने रेल्वे इंजिन आणि कोचचे फोटो काढून त्याआधारे एल्युमिनियम धातूपासून रेल्वेची मॉडेल्स तयार करायला सुरुवात केली. नंतर त्याने त्या अधिक परफेक्शन आणत आज त्याचा प्रवास स्केल मॉडेल्सपर्यंत आणला आहे. त्याची वर्कींग ट्रेन मॉडेल्स तोंडात बोट घालायला लावतील इतकी ती हुबेहुब आहेत. आता तर त्याने पेपर मॉडेल्सवर हुकुमत मिळविली आहे.

रेल्वेकडूनही त्याचे कौतूक झाले आहे.कोणतीही नविन ट्रेन दाखल होताच सुभाष राव त्याचे परफेक्ट मिनीएचर मॉडेल्स तयार करतो. त्याने रेल्वेच्या डब्यांना विविध प्रकारच्या रंगसंगती देखील रेल्वे मंत्रालयाला सुचविल्या आहेत. त्याने निळी आणि पांढऱ्या वंदेभारतचे पेपर मॉडेल्स तयार केले होते, काल परवा दाखल झालेल्या भगव्या (केशरी) रंगाच्या वंदेभारतचे मॉडेल लागलीच त्याने तयार केले.

सुभाष याने वंदेभारत एक्सप्रेसचे स्केल स्टॅटीक मॉडेल तयार केले आहे. वंदेभारतचे नवीन भगवे मॉडेल पेपर मॉडेलसाठी त्याने फोटोग्राफीक पेपरचा वापर करीत एच. ओ. स्केल (1:87 ) मॉडेल तयार केले आहे. तो कोणतंही मॉडेल तयार करण्यासाठी त्या ट्रेनचे फोटोग्राफ्स, ब्ल्युप्रिंट आणि तांत्रिक माहीती याचा आधार घेतो असे त्यानी म्हटले आहे. त्याने यापूर्वी रनिंग मॉडेल्ससाठी प्लास्टीक, कागद, टुथपिक, नेटवर्कींग केबल अशा वस्तूंचा खुबीने वापर केला आहे.

लोकलचा हॉर्न तयार करण्यासाठी त्याने बॉलपेनची निप वापरल्याचे पाहून तुम्ही आश्चर्यचकीत होऊन तोंडात बोट घालाल इतकी ती हुबेहुब लोकलच्या बिगुल सारख्या दिसणाऱ्या हॉर्नच्या जागी फिट झाली आहे. प्रत्येक ट्रेनचे मॉडेल साकार झाल्यावर त्याचे मिनिएचर रुप पाहून त्यातून मिळणार समाधान कशातच नाही असे सुभाष राव सांगतो. ■ ■ ■

## पावसाची अवकाळी इनिंग स्वागतार्ह की विघातक?

**रामचंद्र काळे, कृषी अभ्यासक**

○ अलीकडच्या काही दशकांचा विचार केला तर हवामानामध्ये बदल होतोय आणि परिणामतः ऐन डिसेंबर जानेवारी महिन्यात अवकाळी पाऊस कोसळू लागलेला आहे. मात्र यंदा ऐन मे महिन्यात चक्क मोसमी पावसाने अचानक सुरवात केली आणि संपूर्ण महाराष्ट्राला झोडपून काढले. सर्वसामान्यांच्या दृष्टीने हि बाब स्वागतार्ह असली तरी शेतकऱ्यांचे मात्र या पावसाने अतोनात नुकसान केले आहे. कोकणात आंबा बागा,तर उत्तर महाराष्ट्रात कांदा पिकाचे. पश्चिम महाराष्ट्रात सोयाबीन आणि उसाचे मात्र प्रचंड नुकसान झाल्याने शेतकऱ्यांसाठी हा पाऊस विघातक म्हणायला हवा.

**मीनल साने, शिक्षिका**

○ बदलत्या काळानुसार आणि वातावरणातील होणाऱ्या या बदलाचा परिणाम म्हणजे आता ऋतुचक्र देखील बदलू लागलेले दिसते आहे. मे महिना हा कडक उन्हाळ्याचा समजला जायचा मात्र आता मे महिन्यापासूनच मान्सून संपूर्ण महाराष्ट्रात दाखल झालेला आहे. यामुळे मुंबई सह महाराष्ट्रातील जी धारण आहेत जी खोल गेलेली आहेत ती भरण्यास मदत होईल आणि लोकांच्या पिण्याच्या पाण्याचा प्रश्न अल्प प्रमाणात का होईना सुटेल. शिवाय, शेतीमध्ये नव्या पिकांची लागवड केलेल्या शेतकऱ्यांसाठी देखील हा पाऊस महत्वाचा आहेच. त्यामुळे या पावसाचे स्वागतच. ■ ■

: संकलन व संयोजन :

**सुबोध रणशेवरे, ९८३३१४६३५६**

subodh.ranshevre @rediffmail.com

## सुझुकी मोटरसायकलचे पहिल्या इलेक्ट्रिक स्कूटरचे उत्पादन सुरू




सुझुकी मोटर कॉर्पोरेशन, जपानची दुचाकी उपकंपनी, सुझुकी मोटरसायकल इंडिया प्रायव्हेट लिमिटेडने भारतातील गुडगाव येथील त्यांच्या उत्पादन प्रकल्पात त्यांच्या पहिल्या इलेक्ट्रिक स्कूटर, सुझुकी ई-ॲक्सेसचे उत्पादन सुरू करण्याची घोषणा केली.

भारत मोबिलिटी ग्लोबल एक्स्पो २०२५ मध्ये प्रथम प्रदर्शित केलेले, सुझुकी ई-ॲक्सेस हे ब्रँडच्या भारतातील इलेक्ट्रिक दुचाकी विभागात प्रवेशाचे चिन्ह आहे. दररोजच्या शहरी प्रवासासाठी टिकाऊ, विश्वासार्ह आणि दीर्घकालीन गतिशीलता समाधान देण्यासाठी ई-स्कूटर तयार केले आहे.

सुझुकी ई-ॲक्सेस सुझुकीच्या ई-टेक्नॉलॉजीद्वारे समर्थित आहे, ज्यामध्ये दीर्घ बॅटरी आयुष्य आणि चांगल्या थर्मल स्थिरतेसाठी ओळखली जाणारी लिथियम आयर्न फॉस्फेट (एलएफपी) बॅटरी समाविष्ट आहे. स्कूटरमध्ये रिजनरेटिव्ह ब्रेकिंग, मेंटेनन्स-फ्री बेल्ट ड्राइव्ह सिस्टम आणि रिव्हर्स मोडसह वेगवेगळ्या रायडिंग मोडसाठी (इको मोड, राइड मोड ए, राइड मोड बी) सुझुकी ड्राइव्ह मोड सिलेक्टर-ई (एसडीएमएस-ई) देखील आहेत. याव्यतिरिक्त, विश्वासार्हता सुनिश्चित करण्यासाठी, बॅटरी आणि घटकांची कठोर चाचणी घेतली जाते, ज्यामध्ये सबमर्शन, तापमानातील कमाल, थेंब, कंपन, मोटर बेंच, पंचर आणि क्रश चाचण्यांचा समावेश आहे.सुझुकी ई-ॲक्सेस कमी बॅटरी पातळीवर देखील सर्व वेगांमध्ये सहज प्रवेग आणि सातत्यपूर्ण कामगिरी प्रदान करण्यासाठी डिझाइन केलेले आहे. यामुळे रायडर्सना शहरातील रहदारीतून नेव्हिगेट करताना उत्कृष्ट राइड गुणवत्ता, चपळता आणि मॅन्युव्हरेबिलिटीचा आनंद मिळतो. ■ ■

# आता त्यांना मन:शांती मिळेल...

## मंत्री पंकजा मुंडे यांचे विधान



■ **वृत्तसंस्था, पुणे, दि.३० :** राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते तथा माजी मंत्री धनंजय मुंडे हे मागील आठ दिवसापासून नाशिक जिल्ह्यातील इगतपुरी येथील प्रसिद्ध विपश्यना केंद्रात विपश्यना घेत असल्याचे समजते.

सरपंच संतोष देशमुख हत्या प्रकरण, मंत्रिपदाचा राजीनामा तसेच करुणा मुंडे अशा सगळ्या वादात धनंजय मुंडे गेले काही महीने अडकले होते. आता ते विपश्यना घेत असल्याचे समजते. यावर भाजप नेत्या व मंत्री पंकजा मुंडे यांनी प्रतिक्रिया दिली आहे.

पंकजा मुंडे म्हणाल्या, धनंजय मुंडे यांनी योग्य पर्याय निवडला आहे. आता मनःशांती होईल, असे त्यांनी म्हटले आहे. त्यांनी दिलेल्या या प्रतिक्रियाची सध्या जोरदार चर्चा सुरू आहे. धनंजय मुंडे यांनी मंत्रिपदाचा राजीनामा दिल्यानंतर त्यांच्याकडे असलेले खाते हे राष्ट्रवादीचे ज्येष्ठ नेते छगन भुजबळ यांच्याकडे देण्यात आले आहे.

पंकजा मुंडे यांनी वैष्णवी हगवणे मृत्यू प्रकरणावर देखील प्रतिक्रिया दिली आहे. पंकजा मुंडे म्हणाल्या, वैष्णवीला न्याय मिळायला पाहिजे. त्यासाठी प्रत्येक पाऊल उचलले पाहिजे. याबाबतचा सर्व निर्णय मुख्यमंत्री घेतील. महिला आयोगाने दखल घेणे क्रमप्राप्त आहे. कुठलीही तक्रार असू देत महिला आयोगाने ती घेतली पाहिजे आणि पोलिसांनी कारवाई करायला हवी, असे मुंडे म्हणल्या.

दरम्यान, पंकजा मुंडे यांनी पुण्यात दगडूशेठ हलवाई गणपतीचे दर्शन घेतले आहे. दर्शन घेतल्यानंतर बोलताना त्या म्हणाल्या, पर्यावरण संवर्धनासाठी कार्यक्रम राबावण्याचे ठरवले आहे. प्रत्येक राज्यात कार्यक्रम राबवले जात आहेत.

अहिल्याबाई होळकर यांच्या ३०० व्या जयंतीनिमित्त पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी पर्यावरणाला महत्त्व देण्याच्या अनुषंगाने कार्यक्रम घेण्याचे ठरवले आहे. दगडूशेठ मंडल या पर्यावरण उपक्रमात सहभागी झाला आहे. तसेच प्लॅस्टिकचा वापर करू नका, असे आवाहनही यावेळी पंकजा मुंडे यांनी केले.

# आमदार रवी राणांच्या निवासस्थानासमोर ठिय्या

■ **महासागर प्रतिनिधी, अमरावती, दि. ३० :** आपल्या विविध मागण्यांसाठी फासेपारधी समुदायातील शेकडो गावकऱ्यांनी बडनेराचे आमदार रवी राणा यांच्या येथील निवासस्थानासमोर शुक्रवारी ठिय्या आंदोलन केले. आंदोलकांची समजूत काढण्यासाठी पोलिसांना प्रयत्नांची शर्थ करावी लागली. विदर्भ आदिवासी फासेपारधी समाज संघटनेचे संस्थापक अध्यक्ष मतीन भोसले यांच्या नेतृत्वात हे आंदोलन करण्यात आले.

फासेपारधी समुदायासाठी विशेष आर्थिक पॅकेज जाहीर करण्यात यावे, फासेपारधी समाजाच्या आर्थिक विकासासाठी स्वतंत्रपणे शहीद समशेरसिंग भोसले फासेपारधी आर्थिक विकास महामंडळाची स्थापना करण्यात यावी, अमरावती जिल्ह्यातील बहुतांश फासेपारधी पात्र लाभार्थ्यांना शासकीय लाभ मिळावा, यासाठी आदिवासी विकास विभागाला दरवर्षी शासनाकडून १५ कोटी रुपयांचा निधी मिळावा, इत्यादी मागण्यांसाठी हे आंदोलन करण्यात आले, अशी माहिती मतीन भोसले यांनी दिली.

आर्थिकदृष्ट्या सबळ असलेल्या जाती पारधी पॅकेजमधील अनुदानाचा लाभ घेतात. मात्र, पात्र लाभार्थ्यांपैकी केवळ १० टक्के लोकांना लाभ मिळतो, असे ते म्हणाले.

# डबल महाराष्ट्र केसरीचा ठाकरे गटाला धक्का!

## चंद्रहार पाटील शिंदे गटाच्या वाटेवर

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि.३० :** शिवसेना उद्धव ठाकरे गटासाठी सांगलीतून मोठा धक्का बसण्याची शक्यता आहे. डबल महाराष्ट्र केसरी, ठाकरेंचे विश्वासू आणि सांगली लोकसभा मतदारसंघाचे उमेदवार राहिलेले चंद्रहार पाटील लवकरच शिंदे गटात प्रवेश करणार असल्याची जोरदार चर्चा आहे. शिवसेना नेते आणि उद्योगमंत्री उदय सामंत यांनी सूचक विधान करत या चर्चांना उधाण आणलं आहे.

सांगलीतील भाळवणी गावात मंत्री उदय सामंत यांच्या उपस्थितीत आयोजित कार्यक्रमात चंद्रहार पाटील यांनी सामंतांचा सत्कार केला आणि त्यांना चांदीची गदा भेट दिली. याच वेळी सामंत म्हणाले, ह्लचंद्रहार पाटील यांनी आमच्या गळ्यात हार घातलाय, आता त्यांच्या गळ्यात शिंदे साहेबांनी हार कधी घालायचा हे त्यांनी ठरवावं.ह्व या विधानाने राजकीय वतुर्ळात खळबळ उडाली आहे.

लोकसभा निवडणुकीत चंद्रहार पाटील यांच्यासाठी उद्धव ठाकरेंनी काँग्रेससोबत संघर्ष करत सांगली मतदारसंघ खेचून आणला होता. मात्र, निवडणुकीनंतर पाटील यांची ठाकरे गटापासून नाराजी वाढल्याचे दिसून येत आहे. पाटील यांचा झुकाव शिंदे गटाकडे असून ते प्रवेश करणार असल्याची माहिती आहे.

# राजकीय रणांगणातून विश्रांतीकडे मुंडे?

बीड जिल्ह्यातील मस्साजोग गावचे सरपंच संतोष देशमुख यांच्या निर्घृण हत्येनंतर राजीनामा देणारे राष्ट्रवादी काँग्रेस (अजित गट) नेते धनंजय मुंडे यांच्यासाठी पुन्हा मंत्रिमंडळात येण्याचा मार्ग जवळपास बंद झाल्याचे संकेत आहेत. या प्रकरणातील गंभीर आरोप, तसेच त्यांच्या वैयक्तिक आयुष्यातील वादांमुळे मुंडे सातत्याने चर्चेत राहिले आहेत.

संतोष देशमुख यांच्या हत्येनंतर समोर आलेले धक्कादायक फोटो आणि व्हिडीओंमुळे प्रकरण अधिकच गाजले. त्यानंतर जनतेच्या आणि विरोधकांच्या दबावामुळे मुंडेंना अन्न व नागरी पुरवठा खात्याचा तातडीने राजीनामा द्यावा लागला होता. पुढे त्यांच्या पत्नी करुणा मुंडे यांनी केलेले गंभीर आरोपही सार्वजनिक चर्चेचा विषय ठरले.

मुंडेंच्या राजीनाम्यानंतर त्यांच्या जागी राष्ट्रवादीचे ज्येष्ठ नेते छगन भुजबळ यांना अन्न व नागरी पुरवठा खात्याची जबाबदारी देण्यात आली. त्यामुळे मुंडे यांना पुन्हा मंत्रिमंडळात स्थान मिळण्याची शक्यता जवळपास संपल्याचे राजकीय निरीक्षकांचे मत आहे.

दरम्यान, सध्या मुंडे इगतपुरी येथील विपश्यना ध्यान केंद्रात दाखल असून, मागील आठ दिवसांपासून ते ध्यानसाधनेत व्यस्त आहेत. दहा दिवसांच्या या विपश्यना शिबिरात मोबाईल वापर निषिद्ध असून, बाहेरील संपर्क पूर्णपणे बंद असतो. या काळात ते स्वतःला मनःशांतीसाठी वेळ देत आहेत, अशीही चर्चा आहे.

मुंडेंनी अलीकडच्या काळात अनेक सार्वजनिक कार्यक्रमांना मुक्काम दिला आहे. बीड जिल्ह्यातील नियोजित दौरा त्यांनी अचानक रद्द केला होता. त्याचबरोबर बीडचे पालकमंत्री अजित पवार यांचा दौरा असतानाही मुंडे अनुपस्थित होते.

त्याच वेळी ते त्यांच्या मुलीच्या फॅशन शोमध्ये सहभागी झाल्याचे वृत्त समोर आले होते. या सर्व घटनांमुळे मुंडेंनी जाणीवपूर्वक सार्वजनिक क्षेत्रापासून काहीसा अलिप्त राहण्याचा निर्णय घेतल्याचे बोलले जात आहे.

राजकीय व वैयक्तिक आयुष्यातील वाद, मंत्रीपदाचा गमावलेला अधिकार, आणि त्यानंतर आलेले वैचारिक मंथन हे सगळं पाहता धनंजय मुंडेंचा राजकीय पुनरागमनाचा मार्ग सध्या तरी अधिकच कठीण झाला आहे. ■ ■ ■



**दिपक कैतके**